दैनिक

# समर्थ राजयोग

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ६ वे अंक -२५७ बुधवार दि.२७ मे २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४

Beed Daily Marathi Year-6th Issue-257 Wednesday, Dt.27 May 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# बीड जिल्ह्यातील भयान वास्तव जगाला कळालं परंतु जिल्ह्यातील षंढ राजकारण्यांना नाही



## इथे ऊसतोडीसाठी माता माऊल्या गर्भपिशव्या काढून आपले आयुष्य वेशीवर टांगून जीवन-मरणाचा खेळ खेळत आहेत आणि जिल्ह्यातील पुढारी पैसा - जातीवाद - वर्चस्व - कुरघोडीच्या लढाईत गुंतलेत..!





## पंकजा-प्रीतम मुंडे-नमिता मुंदडा तुम्ही महिला पुढारी असताना तुम्हाला सुद्धा हे विदारक चित्र कळालं नाही, हे तुमचं दुर्दैव की जिल्ह्याचं दुर्दैव की, त्या माता-माऊल्यांच दुर्दैव..?

अंबाजोगाई / सुनील सिरसाट

बऱ्याच वेळा आपण वास्तव जगाच्या खूप लांब रहात असतो. परंतु ज्यांची ही लोकप्रतिनिधी म्हणून जबाबदारी आहे. ज्यांना आपण अगदी विश्वासाने वारंवार निवडून देतो. परंतु पद-प्रतिष्ठा-पैसा-ऐश्वर्य कमावण्यासाठी जे आपल राजकीय वैभव वापरतात. त्यांच्यासाठी जीवाच रान करून दुष्मन्या पत्करून, मारामाऱ्या करून आपण लोकं ज्यांना विधानभवनात- संसद भवनात पाठवतो. अशांनी तरी आपल्या जिल्ह्यात निर्माण झालेल्या गंभीर समस्यांकडे असे दुर्लक्ष करणे म्हणजे ही बाब मनाला पटणारी तर नाहीच. परंतु किती भयंकर आहे हे या ठिकाणी उलघडणं अतिशय कठीण आहे.

बीड जिल्हा म्हणजे ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून बीडची ओळख देशाच्या कानाकोपऱ्यात आहे. याच बीड जिल्ह्यातील ऊसतोड मजुरांच्या जीवावर देशातील कारखाने चालतात आणि केवळ देशालाच नाही तर जगभरात साखर पुरवली जाते. पण ही साखर प्रत्येकाच्या मुखात घालून प्रत्येकाच्या तोंडात गोडवा निर्माण करण्याचं काम ज्या ऊसतोड कुटुंबियांकडून केलं जातं, त्या ऊसतोड कुटुंबातील कित्येक महिलांना ही ऊसतोडी करण्यासाठी आणि ऊसतोडीच्या कामात यत्किंचितही कसूर होऊ नये म्हणून चक्क स्वतःच्या गर्भाच्या पिशव्या काढून स्वतःची मासिक पाळी थांबवण्यासाठी आपले आयुष्य वेशीवर टांगावे लागतं आणि मग अशा माता महिलांचे आयुष्य कमी होतं, कुटुंब उघड्यावर पडतं याला नेमके जबाबदार हे बीड जिल्ह्याचे लोकप्रतिनिधी की, राज्याचे सरकार आहे हा संशोधनाचा भाग आहे. परंतु हे जीवघेणं विदारक महाभयंकर असं चित्र आत्तापर्यंत जिल्ह्यातील- राज्यातील लोकप्रतिनिधींना- पुढाऱ्यांना लक्षात येत नाही आणि सातासमुद्रा पलीकडे जाऊन जगभरातील एखाद्या देशातील सामाजिक कार्यकर्त्याने-पत्रकाराने किंवा दैनिकाने हे चित्र टिपावं आणि त्यावर चार शब्द लिहून जिल्ह्याची-महाराष्ट्राची आणि देशाची नाचक्की जगभरात व्हावी. यापेक्षा दुसरी दुर्दैवी गोष्ट कोणती असू शकते..?

जगभरातील नामांकित दैनिक असलेल्या न्यूयॉर्क टाईम्सने हा सारा महाभयंकर असा निंदनीय प्रकार उघडा पाडून बीड जिल्ह्यासह राज्य-देशातील पुढाऱ्यांसह सरकारच्या तोंडात मोठी चपराक मारली आणि जगासमोर हे चित्र उघडे केले. त्याचा आधार घेऊन आपल्यातील मोठे सामाजिक कार्यकर्ते आशिष मुनका यांनी त्यांच्या भाषेत या मन हेलावणाऱ्या सत्य अशा चित्रावर आपल्या पद्धतीने प्रकाश टाकला असून त्यांच्या लेखासह एक पत्रकार म्हणून माझ्याही मनाला जे वाटले ते या संयुक्त लेखातून समाजासमोर या गंभीर प्रश्नावर प्रकाश टाकण्याचा एक छोटासा प्रयत्न केला आहे.

हा लेख वाचल्यावर अक्षरशः माणूस म्हणून खूप कोसळायला होते. लोकं कसे जिवन जगत असतात त्याचे विदारक चित्र डोळ्यासमोर उभे रहाते. आमच्या पुढार्यांना- पत्रकारांना- सामाजिक कार्यकर्त्यांना आणि सरकारमधील मंत्र्यांना

वास्तव जगाची थोडी ओळख व्हावी म्हणून आशिष मनुका यांचा हा लेख प्रसारित करत आहोत.उींश्रींळपरींळेप या फ्रान्समधील टॉपच्या मिडिया आऊटलेटने सोबत फोटो टाकून बीडमधील ऊसतोड मजूर महिलांबद्दल द वर पोस्ट केली आहे. जी आतापर्यंत ८० लाख लोकांनी बघितली आहे.

गंमत बघा,देशातील एकाही न्यूज चॅनेलला, थशल पोर्टलला, राज्यातील लिडिंग चॅनेल आणि पत्रकारांना हा प्रश्न दिसला नाही. महत्वाचा वाटला नाही. यावर आवाज हजारो कि.मी. दूर बसलेल्या एका पोर्टलने उचलला.

२०२४ मध्ये भारतातील बीड जिल्ह्यात ८४३ महिलांनी ऊसतोडीसाठी जाण्याच्या अगोदर गर्भाशय काढण्याची शस्त्रक्रिया करून घेतली. त्यापैकी ४७७ महिला या ३० ते ३५ वयोगटातील होत्या. ही माहिती महाराष्ट्र सरकारच्या स्वतःच्या आरोग्य सर्वेक्षणातून समोर आली असून तो अहवाल जून २०२५ मध्ये प्रकाशित झाला.

या शस्त्रक्रियांचा संबंध थेट पैशांशी आहे. बीडमध्ये एक पुरुष आणि त्याची पत्नी मिळून कोयता म्हणून कामासाठी नोंदणी करतात हे नाव ते वापरत असलेल्या औजारावरून पडले आहे. मुकादम नावाचा मध्यस्थ त्यांना सहा महिन्यांच्या ऊसतोड हंगामासाठी ५० ते ६० हजार रुपयांची आगाऊ रक्कम देतो. त्या बदल्यात त्या दाम्पत्याला दररोज तब्बल दोन टन ऊस तोडून ट्रकमध्ये भरावा लागतो. हे काम दिवसाला १२ ते १४ तास चालते आणि आठवड्यात एकही सुट्टी नसते.

मुकादम आगाऊ रकमेपैकी १५ ते २५ टक्के हिस्सा घेतो, शिवाय जोडप्याच्या कमाईतील आणखी रक्कम स्वतःकडे ठेवतो. एखादा दिवस काम चुकल्यास २५० ते ५०० रुपयांचा दंड आकारला जातो. एखाद्या महिलेला मासिक पाळीदरम्यान त्रासामुळे एक दिवस सुट्टी घ्यावी लागली, तर तिच्या जवळपास आठवडाभराच्या हातात येणाऱ्या उत्पन्नावर परिणाम होतो. त्यामुळे मासिक पाळीची झंझट संपवण्यासाठी थेट गर्भाशय पिशवीच काढून टाकली जाते. ऊस खरेदी करणाऱ्या साखर कारखान्यांची या सगळ्या प्रक्रियेशी कायदेशीरदृष्ट्या थेट जोड नसते. कारखाना फक्त साखर विकतो. महाराष्ट्रात २१० साखर कारखाने आहेत आणि २०२५-२६ हंगामात जवळपास १ कोटी टन साखर उत्पादन होण्याचा अंदाज आहे. ही साखर खरेदी करणाऱ्यांमध्ये Coca-Cola, PepsiCo,

पान २ वर...






# तुपदाळ खुर्द येथे कडबाच्या गंजीस भीषण आग; लाखोंचे नुकसान



मुखेड ।प्रतिनिधी

मुखेड तालुक्यातील तूपदाळ खु. येथे लागलेल्या भीषण आगीत हनमंत रघुनाथ बोडके, जयसिंग मारोती बोडके, दादाराव नामदेव दोमाटे या तीन शेतकऱ्यांचा अंदाजे दहा ते पंधरा हजार कडबा जळून खाक झाला. जनावराचे वैरण जळून नष्ट झाल्याने कुटुंबीयांवर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे.मिळालेल्या माहितीनुसार,आगीचा भडका इतका मोठा होता की तिन्ही कडबाचे गंजा जवळजवळ असल्याने जळून खाक झाले.

कडबा पूर्णतः जळाल्याने तिन्ही शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी तात्काळ धाव घेत आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. आग विझवण्यासाठी मुखेड येथून अग्निशामक दलाची गाडी घटनास्थळी दाखल झाली होती. आग विझवण्यासाठी सरपंच संदीप घाटे तुपदाळकर , धोंडगीर महाराज गिरी, गजानन गिरी, ज्ञानेश्वर दोमाटे उद्धव पाटील बोडके, अमोल पाटील बोडके, रणवीर दोमाटे, शिवाजी गुरुजी बोडके, माधव दोमाटे , दुर्योधन दोमाटे, सचिन दोमाटे, तुकाराम पिटलेवाड सह गावातील नागरिकांनी मदत केली. या भीषण आगीत शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून शासनाने तातडीने आर्थिक मदत करून बाधित शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# बेलगाव परिसरात वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस

## शेतकऱ्यांच्या आंब्याचे , गंजीचे आणि घरावरील पत्रे उडून गेल्याने प्रचंड नुकसान



मस्साजोग ।प्रतिनिधी

गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या वादळी वाऱ्याने केज तालुक्यातील आरणगाव , बेलगाव, काळेगाव ,माळेवाडी परिसरात वादळी वाऱ्याने जोरदार अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाल्याची घटना दि. २५ मे सोमवार रोजी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. या वादळी वाऱ्यामुळे बेलगाव, आरणगाव , केळगाव, काळेगाव , माळवाडी

पान २ वर...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

संपादकीय....

# अवकाळीचा कहर

महाराष्ट्रात मान्सूनपूर्व अवकाळी पावसाने पुन्हा एकदा राज्यकर्त्यांच्या नियोजनशून्य कारभाराचे वाभाडे काढले आहेत. एका बाजूला शेतकरी उन्हाच्या झळा सहन करत खरीपाच्या तयारीत गुंतलेला असताना दुसऱ्या बाजूला अचानक आलेल्या वादळी पाऊस, गारपीट आणि विजांच्या तडाख्याने शेती, जनजीवन आणि ग्रामीण अर्थव्यवस्था अक्षरशः उद्ध्वस्त झाली आहे. मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र आणि खान्देशातील अनेक जिल्ह्यांमध्ये रब्बी पिके, फळबागा, भाजीपाला आणि पशुधनाचे मोठे नुकसान झाले असल्याच्या बातम्या समोर येत आहेत. हवामान खात्याने आधीच इशारे दिले होते, तरी प्रशासन मात्र नेहमीप्रमाणे झोपेतच दिसले.

दरवर्षी तीच परिस्थिती, तीच हानी आणि तीच आश्वासने! अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे हातातोंडाशी आलेले पीक वाहून जाते, कर्जबाजारीपणा वाढतो आणि आत्महत्यांच्या घटनांनाही खतपाणी मिळते. पण शासनाच्या बैठका, पंचनामे आणि मदतीच्या घोषणा यापलीकडे प्रत्यक्ष दिलासा किती मिळतो हा खरा प्रश्न आहे. अनेक वेळा पंचनामे उशिरा होतात, नुकसान भरपाई तुटपुंजी मिळते आणि ती मिळेपर्यंत शेतकरी आर्थिकदृष्ट्या कोलमडून गेलेला असतो. आपत्ती व्यवस्थापन हा शब्द केवळ सरकारी फाइलपुरता मर्यादित राहिला आहे का, असा सवाल आता सामान्य जनतेतून उपस्थित होत आहे.

विशेष म्हणजे हवामानातील बदल ही आता अपवादात्मक घटना राहिलेली नाही. तापमानातील तीव्र चढउतार, ढगफुटीसदृश्य पाऊस, गारपीट आणि विजांचा वाढता धोका यामुळे शेतीचे पारंपरिक गणित पूर्णपणे बदलले आहे. साताऱ्यासारख्या भागांत ढगफुटीसदृश्य पाऊस पडून जनजीवन विस्कळीत झाले, तर अनेक भागांत विजांच्या धक्क्याने जीवितहानीही झाली. अशा वेळी हवामान आधारित शेती नियोजन, पीक विमा यंत्रणा, जलनियोजन आणि तातडीची मदत यासाठी सक्षम यंत्रणा उभारणे ही काळाची गरज आहे. मात्र प्रत्यक्षात शेतकरी अजूनही देवाच्या भरोशावर आणि सरकारी घोषणांच्या आशेवर जगताना दिसतो.

आज महाराष्ट्रातील ग्रामीण भागात सर्वात मोठी भीती ही नैसर्गिक संकटांची नसून सरकारी उदासीनतेची आहे. कारण संकट आल्यानंतर प्रशासन धावते, फोटोसेशन होते, मंत्री दौरे करतात, पण नुकसान भरपाईच्या फाईली मात्र महिनोनमहिने धूळ खात पडून राहतात. हवामान बदल हा जागतिक प्रश्न असला तरी त्याचे सर्वात मोठे बळी महाराष्ट्रातील शेतकरी आणि कष्टकरीच ठरत आहेत.

सरकारने आता फक्त मदतीच्या घोषणा न करता कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची वेळ आली आहे. अन्यथा प्रत्येक अवकाळीनंतर शेतकऱ्यांच्या डोळ्यातील अश्रू पुसण्याऐवजी राजकीय भाषणेच ऐकावी लागतील. महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेला बळीराजा जर असा सतत कोसळत राहिला, तर केवळ शेतीच नाही तर संपूर्ण ग्रामीण व्यवस्था उद्ध्वस्त होण्यास वेळ लागणार नाही. अवकाळी पाऊस हा नैसर्गिक संकट असू शकतो, पण त्यानंतरची सरकारी निष्क्रियता ही पूर्णपणे मानवनिर्मित आपत्ती आहे..!

---

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२५/सेतु/कावि-९३ दि.१८.०५.२०२६

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **आकाश सुरेश पवार, रा.गोरी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | चैतन्य आकाश पवार | मुलगा | २४.११.२०२३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१७३७ दि.०७.०१.२०२६

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **संजय अशोक कुलकर्णी, रा.पानेगांव ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | संजय अशोक कुलकर्णी | स्वतः | ०४.०८.१९८६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१६३९ दि.२४.१२.२०२६

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **रमेश रामभाऊ नगरे, रा.वडीलासुरा ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | काजल रमेश नगरे | मुलगी | ०१.०९.२०२१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय घनसावंगी**
क्र.प्रस्तु ३ /तह.घन./कावि- /२०२६/
दिनांक : १५/०५/२०२६
वाचा :- जन्म आणि मृत्यु नोंदणी (सुधारणा) अधिनियम-२०२३
**अर्जदार श्री सहदेव संतपराव जाधव, रा.वडीरामसगांव ता.घनसावंगी जि.जालना**

## जाहीर प्रगटन

कलम १३ (३) जन्म - मृत्यू नोंदणी कायदा १९६९ प्रमाणे जन्म - मृत्यु प्रमाणपत्र मिळणेबाबत.

सर्व जनता **रा.वडीरामसगांव** यांना जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, **श्री/श्रीमती/कु/कुमारी. सहदेव संपतराव जाधव, रा.वडीरामसगांव, ता.घनसावंगी जि.जालना** येथील रहीवाशी असल्याबाबत अर्ज, प्रतिज्ञापत्र, देवुन नामे **त्यांनी त्यांची मुलगी नामे संस्कृती सहदेव जाधव, हिचा जन्मदिनांकः-२१/०५/२०२५** ही दर्शविलेली आहे अर्जदार यांनी जन्म नोंद / मृत्यु नोंद आदेश मिळणेसाठी या कार्यालयात विनंती अर्ज दिलेला असुन, उपरोक्त जन्म नोंद / मृत्यु नोंद बाबत कोणास काही उजर/हरकती/आक्षेप / आरोप असे यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात कळवावे. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास कोणास काही आक्षेप नाही असे गृहीत धरुन अर्जदारास जन्म / मृत्यु नोंद आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक -/-/- रोजी माझ्या सही व शिक्का निशी जाहीर करण्यात आले आहे.

**तालुका दंडाधिकारी,**
**घनसावंगी.**

---

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२६/सेतु/कावि-२८२ दि. . .२०२६

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **परसराम गोटीराम राठोड, रा.लालवाडी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **वडील** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | गोटीराम यमाजी राठोड | वडील | ०१.०६.१९७२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१६५६ दि.२४.१२.२०२५

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **बालाजी अंकुश खरात, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | आरूषी बालाजी खरात | मुलगी | २३.०२.२०२२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२५/सेतु/कावि-२३४ दि.२५.०५.२०२६

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **अशोक विश्वनाथ गाडगे, रा.गोरी गंधारी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | आदित्य अशोक गाडगे | मुलगा | ०५.०२.२००८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तहसील कार्यालय, गेवराई ता.गेवराई जि.बीड**
**(दंड विभाग)**

## जाहिर प्रगटन

याव्दारे जाहिर प्रगटन देण्यात येते की प्रकरणात **अर्जदार शेख हिना परवीन शेख गुलाम, रा.गेवराई ता.गेवराई जि.बीड** यांनी असा अर्ज केला आहे की, अर्जदार **यांनी स्वतः**यांचा जन्म दि.१८.१०.१९९४ रोजी **गेवराई** येथे राहत्या घरी झालेला आहे तसेच **अर्जदाराकडुन अनावधानाने नगर परिषद कार्यालय, ता.गेवराई जि.बीड येथे जन्म नोंद घेणे राहुन गेलेले** आहे. अर्जदारास शासकीय जन्म नोंदीचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता अर्जदाराचा अर्ज मंजुर करुन सदरील जन्म नांव नोंद घेणे बाबत **नगर परिषद कार्यालय, ता.गेवराई जि.बीड** यांना आदेशीत करणे बाबत विनंती केली आहे.

करिता जन्माबाबत कोणाची काहीही हरकत असल्यास आपले हरकती अथवा आक्षेप १५ दिवसांचे आत सादर करावेत. त्यानंतर प्राप्त होणा-या हरकती अथवा आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**तालूका दंडाधिकारी गेवराई**

---

**तहसील कार्यालय, गेवराई ता.गेवराई जि.बीड**
**(दंड विभाग)**

## जाहिर प्रगटन

याव्दारे जाहिर प्रगटन देण्यात येते की प्रकरणात **अर्जदार शेख समी शेख गुलाब, रा.गेवराई ता.गेवराई जि.बीड** यांनी असा अर्ज केला आहे की, अर्जदार **यांनी स्वतः**यांचा जन्म दि.१५.०८.१९८९ रोजी **गेवराई** येथे राहत्या घरी झालेला आहे तसेच **अर्जदाराकडुन अनावधानाने नगर परिषद कार्यालय, ता.गेवराई जि.बीड येथे जन्म नोंद घेणे राहुन गेलेले** आहे. अर्जदारास शासकीय जन्म नोंदीचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता अर्जदाराचा अर्ज मंजुर करुन सदरील जन्म नांव नोंद घेणे बाबत **नगर परिषद कार्यालय, ता.गेवराई जि.बीड** यांना आदेशीत करणे बाबत विनंती केली आहे.

करिता जन्माबाबत कोणाची काहीही हरकत असल्यास आपले हरकती अथवा आक्षेप १५ दिवसांचे आत सादर करावेत. त्यानंतर प्राप्त होणा-या हरकती अथवा आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**तालूका दंडाधिकारी गेवराई**

---

पान १ वरुन...

**बीड जिल्ह्यातील भयान...**

चेपवशश्रश (ज्यांच्या मालकीचा उरवल्ीू ब्रँड आहे) आणि णपळश्रर्शींशी यांचा समावेश आहे. २०२४ मध्ये ढहश छशु धीज्ञ ढळाशी आणि ढहश ऱ्रीश्रश्रशी झीेक्षशलीं यांच्या संयुक्त तपासात हा पुरवठा साखळीचा मागोवा घेतला गेला. या तपासात दोन मोठ्या साखर कंपन्यांचा उल्लेख झाला - ऊश्राळर इहरीरीं डींसरी आणि छडङ डींसरीी. या कंपन्या अशा साखर कारखान्यांना ऊस पुरवत होत्या. ज्यांच्याकडे उद्योगातील प्रमुख नैतिक प्रमाणपत्र इेपीींली होते. मात्र त्या संस्थेच्या तपासणीत हे काहीच उघड झाले नाही. जे काही ऑडिटमध्ये सापडले नाही, ते न्यूयॉर्क टाइम्सच्या तपासाने काही महिन्यांत उघड केले.

२०१९ मध्ये सरकारी चौकशीत बीड मधील ८२,३०९ महिला ऊसतोड मजुरांचे सर्वेक्षण करण्यात आले. त्यापैकी १३,८६१ महिलांचे म्हणजे जवळपास १७ टक्के गर्भाशय काढण्यात आले होते. २०२४ मध्ये खखएऊ या आंतरराष्ट्रीय संशोधन संस्थेने बीडमधील ४२३ कुटुंबांचा अधिक सखोल अभ्यास केला. ज्या कुटुंबांतील महिला ऊसतोडीसाठी स्थलांतरित झाल्या होत्या, त्यापैकी ५५.७३ टक्के महिलांची गर्भाशय काढण्याची शस्त्रक्रिया झाली होती. ज्या महिला गावातच राहिल्या, त्यांच्यात हा आकडा १७.०६ टक्के होता. तुलना म्हणून पाहिल्यास, भारतभर १५ ते ४९ वयोगटातील महिलांमध्ये गर्भाशय काढण्याचे राष्ट्रीय प्रमाण फक्त ३.२ टक्के आहे.

२०२४ मधील या बातम्यांनंतर काही हालचाली झाल्या. चेपवशश्रश ने शांतपणे ऊश्राळर इहरीरीं डींसरी सोबतचे संबंध तोडले. उेलर-उेश्र ने ४ साखर कारखान्यांमध्ये कामगार प्रशिक्षण कार्यक्रम सुरू केला. झर्शीळिउे ने फेब्रुवारी २०२५ मध्ये भागधारकांच्या मतदानाला अमेरिकेतील एका नियमाचा आधार घेत रोखले. हा नियम कंपन्यांना त्यांच्या महसुलाच्या ५ टक्क्यांपेक्षा कमी व्यवसायाशी संबंधित मुद्द्यांवर मतदानातील सहभाग रोखण्यास मुभा देतो.

अमेरिकेच्या कामगार विभागाने बीडमधील साखरेचा समावेश जबरदस्तीच्या मजुरीतून तयार होणाऱ्या उत्पादनांच्या यादीत केला. महाराष्ट्र सरकारने २५ फेब्रुवारी २०२६ रोजी पुन्हा एक समिती स्थापन केली. पहिली समिती स्थापन झाल्यानंतर तब्बल सात वर्षांनी. या सात वर्षांत साखरेचे उत्पादन मात्र अखंड सुरूच राहिले. ज्या व्यवस्थेमुळे महिलांना गर्भाशय काढण्यास भाग पाडले जाते, तीच व्यवस्था बाजारातील शीतपेयांच्या डब्यांपर्यंत पोहोचणारी साखर निर्माण करते. आणि आजही या दोन्ही गोष्टी नेमक्या त्याच पद्धतीने सुरू आहेत, जशा त्या सुरुवातीपासून उभ्या करण्यात आल्या होत्या.

मग इतक्या या महाभयंकर प्रसंगाला तोंड देत महाराष्ट्रासह देशभरातील कर्नाटक-गुजरात-तामिळनाडू-आंध्रप्रदेश-तेलंगणा-उत्तर प्रदेश-मध्यप्रदेश या राज्यांमध्ये

पान १ वरुन...

मोठ्या प्रमाणात ऊसतोडी करणाऱ्या बीड जिल्ह्यातील मजूर वर्ग विशेष करून आमच्या महिला माता इतक्या जीवघेण्या प्रसंगातून मार्ग काढत देशासह जगाच्या तोंडात आपण केलेल्या ऊस तोडीच्या माध्यमातून साखरेचा गोडावा पोहोचवत असताना त्यांच्या जीवावर बेतलेल्या ह्या अशा विदारक चित्रापर्यंत आमच्या जिल्ह्यातील-राज्यातील देशातील पुढारी पोहोचत नाहीत ही बाब केवळ पुढार्यांची असमर्थता दर्शवीत नाही, तर आम्ही जीवन जगत असताना किती स्वार्थी झालो आहोत आणि आम्हाला सभोवताली घडणाऱ्या घटनांशी काही देणंघेणं नाही. हेच या अनुषंगाने स्पष्टपणे दिसून येत आहे. तेंव्हा आता तरी एक्स ( द )वरील पोस्ट असतील किंवा न्युयार्क टाइम्सचे प्रकाशित केलेले लिखाण असेल की, आज दै. समर्थ राजयोगच्या माध्यमातून या दुर्लक्षित अशा भयंकर परिस्थितीवर टाकलेला प्रकाश असेल, यानंतर तरी जिल्ह्यातील पुढारी-पत्रकार आणि जिल्हा प्रशासनाला जाग येईल का.? आणि यापुढे तरी ऊसतोड कामगारांसह याच कामगारांच्या अर्धांगिनी म्हणून त्यांच्या खांद्याला खांदा लावून राबत असणाऱ्या आमच्या माता माऊलांच्या गर्भपिशव्या काढायचे थांबेल का.? मासिक पाळी मध्ये एक छदामही न काटता त्यांना चार दिवसाची सुट्टी कारखाने, साखर आयुक्त आणि सरकार देईल का..? यासह असंख्य प्रश्न या ठिकाणी निर्माण होऊन ते अनुत्तरितच आहेत. परंतु अमेरिकेच्या न्युयार्क पासून सुरुवात झालेल्या प्रकाशमय लिखाणाने बीडच्या दै.समर्थ राजयोग पर्यंत आलेल्या या लिखाणा नंतर तरी, संबंधित सारे जागे होतील का..? हे पाहणे आता औस्तुक्याचे ठरेल.!

**बेलगाव परिसरात....**

परिसरातील जनजीवन विस्कळीत होऊन शेतकऱ्यांच्या शेतातील आंब्याचे झाडे, बाभळीचे झाडे जमिन दोस्त झाल्याने अंब्याचे, जनावरांसाठी चारा ठेवलेल्या कडब्याच्या गंजीचे आणि शेतकऱ्यांचे घरावरचे पत्रे उडून एक ते दीड किलोमीटर अंतरावर जाधव जवळा शिवारात जाऊन , जनावरांसाठी निवारा केलेल्या पत्राच्या शेड आणि शेतातील इतर पिकांचे मोठे नुकसान झाले आहे . या नुकसानीत बेलगाव येथील अक्षय दातार,विठ्ठल गिते,विकास दुनघव,तुकाराम दुनघव , सुरेश दातार या शेतकऱ्यांचा समावेश आहे. या झालेल्या नुकसानीने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले असून शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होऊन चिंताजनक परिस्थिती निर्माण झाली आहे . त्यामुळे शेतकऱ्यांच्या भरपाई नुकसान देण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

बेलगाव, केळगाव परिसरात सोमवारी वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस झाल्याने आमचे आणि शेजारच्या शेतकर्यांचे आंब्याचे झाडाचे व घरावरील पत्रे उडून गेल्याने प्रचंड नुकसान झाले आहे.तरी प्रशासनाने तातडीने झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी.

अक्षय दातार.शेतकरी बेलगाव ता.केज

---



## आ. विजयसिंह पंडित यांच्या प्रयत्नाने बीड जिल्ह्याच्या पीक विमा

### प्रश्नावर मंत्रालयात महत्त्वपूर्ण बैठक

# प्रलंबित नुकसान भरपाईबाबत कृषीमंत्र्यांचे तातडीने कार्यवाहीचे निर्देश

मुंबई ।प्रतिनिधी

प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या नुकसान भरपाईतून बीड जिल्हा वगळल्या बाबत आ. विजयसिंह पंडित यांनी मंत्रालयात आवाज उठवला, त्यामुळे आज राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात एक महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. सप्टेंबर २०२५ मध्ये बीड जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टी व महापुरासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेती आणि पिकांचे मोठे नुकसान झाले होते. एनडीआरएफच्या (छऊठऋ) निकषांनुसार प्रतिहेक्टरी ८,५०० रुपये नुकसान भरपाई देण्याची घोषणा शासनाने केली होती. तसेच, रब्बी पेरणीसाठी प्रतिहेक्टरी १० हजार रुपये व पीक विमाधारक शेतकऱ्यांना किमान १७,५०० रुपये नुकसान भरपाई देण्याची घोषणा मा. मुख्यमंत्री महोदयांनी केली होती. या घोषणेनुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना अनुदान स्वरूपात नुकसान भरपाईचे वाटप त्वरित व्हावे, यावर आजच्या बैठकीत सविस्तर चर्चा झाली असून प्रलंबित नुकसान भरपाईबाबत कृषीमंत्र्यांचे तातडीने कार्यवाहीचे निर्देश देण्यात आले आहेत.या बैठकीला कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह, कृषी संचालक विनयकुमार आवटे यांच्यासह शेतकरी प्रतिनिधी उपस्थित होते.

# शांत,संयमी,आदर्श मुख्याध्यापक- श्री.चांगदेव पांडुरंग तरटे

आष्टी ।प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सांगवी (पाटण), केंद्र डोईठाण, ता. आष्टी, जि. बीड येथील कर्तव्यदक्ष व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असलेले मुख्याध्यापक श्री. तरटे चांगदेव पांडुरंग हे वयोमानानुसार दि. ३१ मे २०२६ रोजी सेवानिवृत्त होत असून, त्यांच्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवेला गौरविण्यासाठी सेवापूर्ती गौरव समारंभाचे भव्य आयोजन गुरुवार दि. २८ मे २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता करण्यात आले आहे. हा कार्यक्रम सांगवी (पाटण) येथील स्वराली लॉन्स, नगर-बीड रोड येथे मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. यानिमित्ताने त्यांच्या शैक्षणिक कार्याचा राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक राजेंद्र लाड यांनी घेतलेला आढावा.

शिक्षक ही केवळ नोकरी नसून समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे, याची प्रचिती आपल्या प्रदीर्घ सेवेतून देणारे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सांगवी (पाटण), ता. आष्टी, जि. बीड येथील आदर्श मुख्याध्यापक श्री. तरटे चांगदेव पांडुरंग हे दि. ३१ मे २०२६ रोजी वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत. तब्बल ३७ वर्षे ९ महिन्यांच्या प्रदीर्घ, समर्पित व उल्लेखनीय शैक्षणिक सेवेनंतर ते सेवामुक्त होत असले तरी त्यांच्या कार्याचा ठसा विद्यार्थी, पालक, सहकारी शिक्षक आणि समाजमनावर कायमस्वरूपी उमटलेला आहे.

श्री. तरटे चांगदेव पांडुरंग यांचा जन्म दि. १२ मे १९६८ रोजी एका संस्कारी व कष्टाळू कुटुंबात झाला. त्यांचे वडील पांडुरंग बाबुराव तरटे तर आई सुंदरबाई पांडुरंग तरटे यांनी मुलामध्ये शिक्षणाची आवड, कर्तव्यपरायणता आणि समाजसेवेची जाणीव रुजवली. या संस्कारांचा प्रभाव पुढे त्यांच्या संपूर्ण शिक्षक जीवनात प्रकर्षाने दिसून आला.

त्यांची शिक्षक म्हणून प्रथम नियुक्ती दि. ५ सप्टेंबर १९८८ रोजी झाली. शिक्षक दिनाच्या दिवशीच मिळालेली नियुक्ती ही त्यांच्या आयुष्यातील एक महत्त्वपूर्ण घटना ठरली. त्या दिवसापासून त्यांनी शिक्षण क्षेत्रात स्वतःला पूर्णपणे वाहून घेत विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, सामाजिक आणि नैतिक विकासासाठी सातत्याने काम केले.

त्यांची प्रथम नियुक्ती जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कारखेल (बुद्रुक), केंद्र डोईठाण, ता. आष्टी, जि. बीड येथे झाली. त्या काळात ही शाळा द्विशिक्षकी (इयत्ता १ ली ते इयत्ता ४ थी) स्वरूपाची होती. ग्रामीण भागातील शैक्षणिक अडचणी, पालकांमधील जागृतीचा अभाव, अपुरी सुविधा अशा अनेक आव्हानांचा सामना करत त्यांनी अथक परिश्रम घेतले. पालकांचे समुपदेशन, गावकऱ्यांचे उद्बोधन, विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी आवड निर्माण करणे आणि शाळेच्या गुणवत्तावाढीसाठी सातत्यपूर्ण प्रयत्न यांच्या माध्यमातून त्यांनी या शाळेचे रूपांतर उच्च प्राथमिक शाळेत म्हणजे इयत्ता सातवीपर्यंतच्या शाळेमध्ये करण्यात मोलाचा वाटा उचलला. त्यांनी येथे सन १९८८ ते सन २००२ अशी सलग १४ वर्षे सेवा बजावली.



यानंतर बदलीमुळे त्यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कापसी, केंद्र डोईठाण, ता. आष्टी, जि. बीड येथे सन २००२ ते सन २०११ या कालावधीत तब्बल ९ वर्षे सेवा दिली. या काळातही त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता वाढ, शिस्त, संस्कार आणि पालक सहभाग यावर भर देत शाळेच्या विकासासाठी सातत्याने कार्य केले. ग्रामीण विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी शिक्षणाला व्यवहारज्ञानाची जोड दिली.

पुढे प्रशासकीय बदलीमुळे त्यांची नियुक्ती जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जोडवाडी, ता. गेवराई, जि. बीड येथे झाली. येथे त्यांनी सन २०११ ते सन २०१४ या कालावधीत ३ वर्षे सेवा केली. नवीन परिसर, नवीन परिस्थिती आणि वेगवेगळ्या शैक्षणिक गरजा असूनही त्यांनी आपल्या अनुभवाचा प्रभावी वापर करत विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी आणि शाळेच्या उन्नतीसाठी उल्लेखनीय कार्य केले.

त्यानंतर त्यांची बदली जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सांगवी (पाटण), केंद्र डोईठाण, ता. आष्टी, जि. बीड येथे झाली. येथे त्यांनी सन २०१४ ते सन २०१८ या कालावधीत शिक्षक म्हणून ४ वर्षे सेवा दिली. विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता, स्वच्छता, शिस्त आणि संस्कारक्षम शिक्षण यासाठी त्यांनी घेतलेले उपक्रम आजही स्मरणात आहेत.

यानंतर त्यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दरेवाडी, केंद्र डोईठाण, ता. आष्टी, जि. बीड येथे सन २०१८ ते सन २०२३ या कालावधीत ५ वर्षे सेवा बजावली. या काळात त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता सुधारणा, नियमितता आणि सर्वांगीण विकासासाठी विशेष प्रयत्न केले.

यानंतर त्यांच्या कारकिर्दीतील एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे त्यांची मुख्याध्यापक म्हणून पदोन्नती. विशेष म्हणजे ज्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सांगवी (पाटण) येथे त्यांनी शिक्षक म्हणून काम केले, त्याच शाळेवर पुन्हा मुख्याध्यापक म्हणून त्यांची नियुक्ती झाली. हे त्यांच्या कार्यक्षमतेचे, अनुभवाचे आणि प्रशासनाच्या विश्वासाचे द्योतक मानले जाते. त्यांनी येथे सन २०२३ ते ३१ मे २०२६ पर्यंत मुख्याध्यापक म्हणून उत्कृष्ट सेवा बजावत शाळेच्या प्रगतीसाठी विविध उपक्रम राबवले. विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, गुणवत्ता, पालक सहभाग, शाळेची प्रगती आणि शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यासाठी त्यांनी उल्लेखनीय कार्य केले.

शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाची दखल विविध स्तरांवर घेण्यात आली. त्यांच्या उत्कृष्ट कार्याबद्दल स्वामी विवेकानंद शिक्षकांची सहकारी पतसंस्था मर्यादित, कडा, ता. आष्टी, जि. बीड यांच्या वतीने त्यांना आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. हा पुरस्कार त्यांच्या शैक्षणिक निष्ठेचा, कर्तव्यपरायणतेचा आणि विद्यार्थ्यांप्रती असलेल्या समर्पणाचा सन्मान मानला जातो.

शिक्षणासोबतच राष्ट्रीय कर्तव्यांमध्येही त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. सन १९९१, सन २००१ आणि सन २०११ या वर्षी झालेल्या जनगणना मोहिमेत प्रगणक म्हणून उत्कृष्ट कार्य करत त्यांनी शासनाच्या राष्ट्रीय कार्यातही जबाबदारीने योगदान दिले. श्री. तरटे हे तसे पाहिले तर फार नशीबवान आहेत की, ज्यांची सेवा ३ वर्षे सोडली तर संपूर्ण शैक्षणिक सेवा ही डोईठण केंद्रातच गेलेली आहे.

त्यांच्या यशस्वी शैक्षणिक वाटचालीत त्यांच्या पत्नी सौ. शोभा चांगदेव तरटे यांचे मोठे योगदान राहिले आहे. आदर्श गृहिणी म्हणून त्यांनी कुटुंबाची जबाबदारी समर्थपणे सांभाळत पतीच्या सेवाभावी कार्याला कायम पाठबळ दिले. मुलांच्या शिक्षण, संस्कार आणि जडणघडणीतही त्यांचा सिंहाचा वाटा राहिला.

श्री. तरटे सरांचा परिवारही उच्चशिक्षित आणि प्रगतिशील विचारांचा आहे. त्यांचा मोठा मुलगा किरण चांगदेव तरटे हा बी.ई.ई. अँड टी.सी. व एम.बी.ए. असून उच्चशिक्षित आहे. तो सध्या पुणे येथे नोकरी करत आहे. दुसरा मुलगा डॉ. आशिष चांगदेव तरटे हा बीएएमएस शिक्षण पूर्ण करून वैद्यकीय क्षेत्रात पुणे येथे कार्यरत आहे. त्यांची सून सौ. पूजा किरण तरटे या सॉफ्टवेअर इंजिनिअर असून उच्चशिक्षित आहेत व पुणे येथे कंपनीत जॉब करत आहेत. तसेच त्यांना समय किरण तरटे हा नातू असून कुटुंबात आनंदाचे वातावरण आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आयुष्य झोकून देणारे, विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानासोबत संस्कार रुजवणारे, पालकांमध्ये शिक्षणाची जाणीव निर्माण करणारे आणि शाळाविकासाला आपले ध्येय मानणारे श्री. तरटे चांगदेव पांडुरंग सर हे शिक्षक समाजासाठी प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणून कायम स्मरणात राहतील. त्यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त शिक्षक, विद्यार्थी, पालक, मित्रपरिवार आणि ग्रामस्थांकडून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत असून त्यांच्या निरोगी, आनंदी व दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

शब्दांकन...
- राजेंद्र लाड,आष्टी
(९४२३१७०८८५)

# शिवाजीनगर येथील खुनाच्या गुन्ह्यातील आरोपीस एलसीबीने ठोकल्या बेड्या

बीड ।प्रतिनिधी

दारूच्या दुकानात हिशोबात झालेल्या घोळातील संशयातून हॉटेल मालकाने कामगाराला बेदम मारहाण केली आणि खून केल्याची घटना घडली होती. या प्रकरणातील मुख्य आरोपीला पकडण्यामध्ये एलसीबी ला मोठे यश आले आहे.आरोपीला ताब्यात घेऊन बेड्या ठोकण्यात आल्या आहेत.

प्राप्त माहितीनुसार,फिर्यादी नामे संगीता उमेश दळवी वय २८ वर्षे रा. गोरेवस्ती बालेपीर बीड यांनी पोलीस स्टेशन शिवाजीनगर येथे फिर्याद दिली की, दिनांक २३/०५/२०२६ रोजी फिर्यादीचे पती नामे उमेश नवनाथ दळवी वय ३५ वर्षे रा. गोरेवस्ती बालेपीर हे दारुच्या दुकानात कामाला होते. तेथे शेख इरफान ऊर्फ लाला याने त्यांना या अगोदर तु दुकानात काम व्यवस्थीत करत नाही या कारणावरुन मारहाण केली होती. दिनांक २३/०५/२०२६ रोजी दारुच्या दुकानात हिशोबात घोळ झाल्याचे कारणावरुन शेख इरफान ऊर्फ



लाला याने मारहाण करुन जिवे मारले आहे. वगैरे फिर्याद वरुन पोलीस स्टेशन शिवाजीनगर गुरनं १२४/२०२६ कलम १०३(१),११५ (१), ३५१ (२),३५२ भान्यासं सह कलम ३ (१) (४), ३(१) (५) अनु.जाती जमाती अधिनियम अन्वये गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखा करीत होती.

दि.२६.०५.२०२६ रोजी पोलीस निरीक्षक बंटेवाड यांचे ओदशावरुन स्थागुशा येथील पोउपनि खटावकर यांचे एक विशेष पथक स्थापन करुन हे सदर गुन्ह्याचा तपास करत असतांना त्यांना गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, सदर गुन्ह्यातील आरोपी हा बालेपीर येथे लपुन बसलेला आहे. अशी खात्रीलायक बातमी मिळाले वरुन सदर पथकाने तांत्रीक विश्लेषण व गोपनीय बातमीदाराचे मदतीने त्यास मोठ्या शिताफिने ताब्यात घेतले. आरोपी नामे शेख इरफान ऊर्फ (लाला) शेख समद, वय ३८ वर्ष, रा.इंदीरागांधी शाळेजवळ, आमराई, नगररोड, बालेपीर ता.जि.बीड याने गुन्हा केल्याची कबुली दिल्याने आरोपीस पुढील तपास कामी तपासी अधिकारी उपविभागीय पोलीस अधिकारी साहेब बीड यांचे ताब्यात दिलेले आहे. पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी बीड हे करत आहेत.सदरची कामगिरी प्रभारी पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके मॅडम, सहाय्यक पोलीस अधीक्षक व्यंकटराम साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे, पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, पोउपनि श्रीराम खटावकर, पोह/ अशोक दुबाले, पोह/राहुल शिंदे, पोह/ युनुस बागवान, पोअ/ अशफाक सय्यद, पोअ/मनोज परजणे, पोअं/ अश्वीन सुरवसे, चापोअ/नितीन वडमारे यांनी केली आहे.

# त्या भाजी विक्रेतीला नगराध्यक्षांनी दिला आधार



बीड ।प्रतिनिधी

शहरातील नवी भाजी मंडई येथे अतिक्रमणावर कारवाई करत असतांना एका भाजी विक्रेत्या महिलेची भाजी तसेच जेवणाचा डब्बा बळजबरीने उचलून ट्रॅक्टरमध्ये फेकल्याचा प्रकार घडला होता. या प्रकरणात संबंधित कर्मचार्याविरूध्द निलंबनाची कारवाई केल्यानंतर नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे यांनी संबंधित महिलेच्या घरी जाऊन त्यांना साडी-चोळी देत भविष्यात आपण पुर्ण ताकदीने पाठीशी असल्याचा विश्वास दिला.

एवढेच नव्हे तर नवी भाजी मंडईत योग्य ठिकाणी जिथे अतिक्रमण नसेल त्या ठिकाणी जागा देण्याचा शब्द संबंधित महिलेला दिला. आज्जी तुम्ही काळजी करू नका, तुमचे कसलेही नुकसान होणार नाही. नवी भाजी मंडईतच तुम्हाला योग्य ठिकाणी जागा उपलब्ध करून देते असे नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे यांनी सांगितले. भविष्यात तुम्हाला त्रास होणार नाही, मी तुमच्या सोबत असेल असाही शब्द यावेळी त्यांनी दिला.

# अहिल्यादेवी होळकर पुतळ्याच्या पुनर्रचनेची मिनाक्षी देवकते यांची मागणी

## जयंतीपुर्वी काम पुर्ण करण्याचे मुख्याधिकारी फडसे यांना निवेदन

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील सिद्धी विनायक कॉम्प्लेक्स परिसरात उभारण्यात आलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याची कायमस्वरूपी पुनर्रचना करून परिसराचे सुशोभीकरण करण्यात यावे, अशी मागणी बाणाई महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा तसेच धनगर समाज अहिल्या महिला आघाडीच्या प्रदेश सचिव मिनाक्षी देवकते डोमाळे यांनी मुख्याधिकारी नगर परिषद यांना निवेदनपत्र देवून केली आहे. तसेच याबाबत नगराध्यक्षा प्रेमलता पारवे मॅडम यांना त्यांचे प्रतिनिधी शेख मुजीब यांच्या



मार्फत निवेदन देखील दिले आहे.

अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळयाखालचा तसेच आजूबाजूचा भाग मोठ्या प्रमाणात खचत चालला असून, यापूर्वी दोन वेळा केवळ तात्पुरती दुरुस्ती करण्यात आली होती. मात्र सद्यस्थितीत पुन्हा परिसर धोकादायक बनला असून, कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे.

दि. ३१ मे २०२६ रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती असल्याने त्यापूर्वी पुतळ्याची पुनर्रचना व परिसरातील सर्व कामे दर्जेदार आणि टिकाऊ स्वरूपात पूर्ण करण्यात यावीत, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या संपूर्ण समाजासाठी प्रेरणास्थान असल्याने त्यांच्या स्मारकाची योग्य देखभाल आणि सुशोभीकरण होणे आवश्यक असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. नगर परिषद प्रशासनाने या मागणीची तातडीने दखल घेऊन कार्यवाही करावी, अशी अपेक्षा प्रदेश सचिव मिनाक्षी ताई देवकते-डोमाळे यांनी आणि धनगर समाज बांधव व महिला भगिनींकडून व्यक्त करण्यात आली आहे.

# लातूर येथे निवृत्तीवेतनधारक आणि अधिकाऱ्यांसाठी पेन्शन अदालत कार्यशाळा उत्साहात

## महालेखाकार नागपूर व जिल्हा कोषागार कार्यालय लातूरचा संयुक्त उपक्रम

लातूर ।प्रतिनिधी

जिल्ह्यातील सर्व कार्यालय प्रमुख आणि त्यांच्या अधिपत्याखालील निवृत्तीवेतनधारकांच्या अडीअडचणींचे निवारण करण्यासाठी आज लातूर येथे विशेष कार्यशाळा आणि पेन्शन अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. नागपूर महालेखाकार आणि लातूर जिल्हा कोषागार कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीमधील डीपीडीसी हॉलमध्ये या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेत नागपूर महालेखापाल कार्यालयाचे वरिष्ठ लेखाधिकारी मैथिली जगन्नाथन, सहायक लेखाधिकारी





चेतनकुमार गुप्ता आणि लेखापाल समिर मीना यांनी उपस्थित सर्व कार्यालय प्रमुखांना निवृत्ती वेतन प्रकरणे (पेंशन पेपर्स) अत्यंत अचूकपणे कसे सादर करावेत, याबाबत सविस्तर व तांत्रिक मार्गदर्शन केले. तसेच निवृत्तीवेतनधारकांना येणाऱ्या विविध अडचणी व समस्या प्रत्यक्ष ऐकून घेत त्यांचे जागेवरच निराकरण केले.या बैठकीला लातूर जिल्हा कोषागार कार्यालयाच्या जिल्हा कोषागार अधिकारी डॉ. उज्वला भा. पाटील, अप्पर कोषागार अधिकारी ख.नै. खोजे, मा.रो. गुट्टे आणि ना. ए. बुध्दिवंत प्रामुख्याने उपस्थित होते. या पेन्शन अदालतीच्या यशस्वी आयोजनासाठी आर. डी. माने, स्वामी एस.एस., कुलकर्णी ए.डी., एस.व्ही. बिराजदार, ब.म.पांचाळ, अ.द.सिरसाट आणि नामदेव कोकरे यांनी परिश्रम घेतले. कार्यशाळेला जिल्ह्यातील बहुसंख्येने कार्यालय प्रमुख, आहरण व संवितरण अधिकारी आणि निवृत्तीवेतनधारक उपस्थित होते.

# लाच मागितल्याच्या आरोपातून पोलीस हवालदाराची निर्दोष मुक्तता

बीड ।प्रतिनिधी

दिनांक २२-१०-२०१७ रोजी परळी येथील हॉटेल चालक तक्रारदार, रा. धर्मापुरी, ता. परळी वै. याने त्याचे हॉटेलमधील वेटर यांना स्थानिक गुन्हे शाखा बीड येथे प्रतिबंधक कारवाईसाठी न पाठवता, पोलीस ठाण्यातच जामीन करणेसाठी पोलीस ठाणे परळी ग्रामीण येथील पोलीस निरीक्षक श्री. चव्हाण व पोलीस हवालदार आडेकर हे रू.५,०००/- ची व तक्रारदार याच्या वाळूच्या तीन गाड्या टिप्परचे प्रत्येकी रु. ३,०००/- व त्याचे हॉटेलचा प्रतिमहिना रू.३,०००/- असे एकूण रू.१२,०००/- चे लाचेची मागणी करत आहेत व त्यांचे वर कारवाई करावी, अशा आशयाची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, बीड यांचेकडे दिली होती.

या तक्रारीवरून पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, बीड यांनी दि.२२-१०-२०१७ रोजी लाच मागणी पडताळणी केली होती. व इतर तांत्रिक बाबीची पुर्तता करून आरोपी पोलीस हवालदार कपील आडेकर यांचे विरूद्ध लाच लुचपत प्रतिबंधक कायद्याचे कलम ७ व १५ अन्वये दोषारोपपत्र न्यायालयात पाठवले होते.सदर प्रकरण हे विशेष जिल्हा सत्र न्यायाधीश, अंबाजोगाई यांचे समोर वर्ग झाले होते. त्यात सुनावणी होऊन फिर्यादी पक्षाच्या वतीने एकूण चार साक्षदार तपासले होते. प्रकरणात आरोपीच्या वकीलांचा युक्तीवाद व बचाव लक्षात घेऊन विशेष जिल्हा व सत्र न्यायाधीश (स्पेशल जज्ज), अंबाजोगाई यांनी आरोपीची निर्दोष मुक्तता केली.

सदर प्रकरणात आरोपीच्या वतीने



अँड. विजयकुमार रामचंद्रराव देशपांडे यांनी काम पाहीले. त्यांना अँड. राजेश देशपांडे व अँड. जयंत बारजकर यांनी सहकार्य केले. प्रकरणाच्या निकालाकडे संपूर्ण पोलीस कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले होते.

## दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त

# पोद्दार हॉस्पिटलमध्ये आयोजित अस्थिरोग शिबिरात ९८ रुग्णांची तपासणी उपचार शिबिर संपन्न



लातूर ।प्रतिनिधी

दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांच्या ८१ व्या जयंतीदिनाचे औचित्य साधून येथील पोद्दार हॉस्पिटलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या अस्थिरोग शिबिरास अत्यंत उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला. या शिबिरात तब्बल ९८ रुग्णांची तपासणी - उपचार करण्यात आले.

या शिबिराच्या उदघाटन प्रसंगी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे ज्येष्ठ नेते उल्हासदादा पवार, लातूरचे खासदार डॉ. शिवाजी काळगे , महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस जितेंद्र देहाडे, अभिजीत देशमुख, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके, महापौर जयश्रीताई सोनकांबळे, उपमहापौर एड. स्नेहल उटगे, विलास बँकेचे चेअरमन एड. किरण जाधव, माजी उपमहापौर कैलास कांबळे, माजी नगरसेविका खाजाबानू बुऱ्हाण, श्याम धूत, विजय पस्तापुरे , संजीव भार्गव, दीपक वारद , आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

दैनिक समर्थ राजयोग
राजमान्य-राजश्री
SAMARTH RAJYOG
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA )


# पंतप्रधान मोदी यांच्या इंधन बचतीच्या आवाहनाला पंकजाताईंनी दिला अनोखा प्रतिसाद

# लोकनेते मुंडे साहेबांची पुण्यतिथी यावर्षी गोपीनाथ गडावर नव्हे तर आपापल्या गावात, घरीच करा - ना.पंकजाताई मुंडे



## ताई अश्या निर्णयामुळेच मुंडे भक्त दुरावत चालला आहे...?

इंधन बचती करता मोदींच्या आव्हानानुसार ताई आपण केलेले आवाहन निश्चितच कौतुकास्पद आहे. मात्र ताई मुंडे साहेबांबद्दल मनातून जे प्रेम आहे ते पुण्यतिथी, जयंती या कार्यक्रमातून दरवर्षी अधिक घट्ट होते. मात्र आपण अशा कारणामुळे जर गोपीनाथ गडावर भक्तांना येण्यासाठी रस्ताच बंद करणार असाल ? तर हळूहळू भक्त आणि त्यांचे निष्ठा जर कमी झाली आणि ती दुसरीकडे कुठे वळाली ? तर ताई तुम्हाला कार्यकर्त्यांशिवाय भविष्यात राजकारण करणे अवघड जाईल.

मुंबई ।प्रतिनिधी

लोकनेते गोपीनाथराव मुंडे सर्वांचे श्रद्धास्थान व ऊर्जास्थान आहे. दरवर्षी ३ जून आला की प्रत्येकाच्या मनात हुरहूर लागून जाते. आपल्या लोकनेत्याच्या आठवणीने आजही लाखोंचा जनसागर गोपीनाथ गडावर तीन जूनला दाखल होतो. मात्र सद्य परिस्थितीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद त्याचबरोबर पेट्रोल डिझेलचा वापर कमी करून सर्वांची गैरसोय टाळण्याच्या दृष्टीने गोपीनाथ गडावर न येता सर्वांनी आहे त्या ठिकाणी, आपापल्या घरात व गावात पुण्यतिथी करावी असे आवाहन राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी केले आहे.

लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांची ३ जून ला पुण्यतिथी असते. त्या निमित्ताने गोपीनाथराव मुंडे यांची समाधी असलेल्या गोपीनाथ गडावर दरवर्षी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून जनसागर येत असतो.मात्र गोपीनाथराव मुंडे यांना अभिप्रेत असलेली जनकल्याणाची कामे करणे, ज्यांचा कोणी वाली नाही त्यांचा वाली होणे, ज्यांची वाणी नाही त्यांची वाणी होण्याचा प्रयत्न करणे हे विचार आपण पुढे घेऊन जाण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत आहोत. तीन जून जवळ आला की प्रत्येकाला हुरहूर लागलेली असते. मात्र सध्य परिस्थिती पेट्रोल डिझेलचा तुटवडा व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेले आवाहन या दृष्टीकोनातून कोणाचीही गैरसोय होणार नाही यासाठी आपण गोपीनाथ गडावर येण्याचे टाळावे.आपापल्या गावात व आपण आहात त्या ठिकाणी लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांची पुण्यतिथी करा.त्यांच्या विचाराला साजेसे उपक्रम साजरे करा. त्यामुळे गोपीनाथ गडावर मोठा कार्यक्रम आयोजित केला जाणार नाही. सर्वांनी पंतप्रधानांच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन व पेट्रोल डिझेल वापर टाळण्यासाठी यावर्षी गावागावात पुण्यतिथी करावी असे आवाहन पंकजाताई मुंडे यांनी केले आहे.

## धाराशिव-बीड-लातुर विधान परिषद निवडणूकीमध्ये

# २०१७ मधील बीड जि.प.सदस्यांना मतदानाचा अधिकार द्या अन्यथा निवडणूक स्थगीत करा - अशोक लोढा

बीड ।प्रतिनिधी

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदार संघातील विधान परिषदेच्या १७ जागांसाठी निवडणुका घोषित झाल्या आहेत.या निवडणुकीत पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका आणि महानगरपालिकां मधील निवडून आलेले सदस्य मतदार म्हणून सहभागी होतात. यामधून विधान परिषदेचे सदस्य निवडले जातात. परंतु न्यायालयीन प्रक्रियेमुळे बीड जिल्हा परिषदेची निवडणूक न झाल्याने बीड ग्रामीण जिल्ह्याचे प्रतिनिधित्व अबाधित राखण्यासाठी २०१७ मधील जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सभापती यांना मतदानाचा हक्क बजावण्याची संधी द्यावी, अन्यथा धाराशिव- बीड लातूर- निवडणुक स्थगित करण्यात यावी, अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे जिल्हा परिषद सदस्य तथा शहर अध्यक्ष अशोक लोढा यांनी केली आहे.



महाराष्ट्रात द्विगृह विधानमंडळ व्यवस्था असुन विधान परिषद हे राज्य विधिमंडळाचे उच्च सभागृह आहे.स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणूक ही राज्याच्या लोकशाही व्यवस्थेतील अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया मानली जाते.मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ आणि मुंबई विभागातील अनेक महत्त्वाच्या मतदारसंघांचा समावेश आहे. मराठवाड्यातील धाराशिव- बीड- लातूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघ राजकीय दृष्ट्या महत्त्वाची मानली जाते. बीड मध्ये नगरपालिकेच्या निवडणुका झाल्या परंतु जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुका होऊ शकल्या नाही. धाराशिव- बीड- लातूर मतदार संघाची मतदार यादी संविधानिक दृष्ट्या अपूर्ण आहे. जिल्ह्यातील ग्रामीण भागाचे प्रतिनिधित्व नाकारले जाणार आहे.

भारतीय राज्यघटनेने मतदानाचा मूलभूत अधिकार व्यापक दृष्टिकोनातून दिलेला आहे. बीड मतदार संघाचा अविभाज्य भाग असेल आणि या मतदारसंघातील जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सदस्य संविधानिक दृष्ट्या मूळ मतदार असतील तर त्यांना मतदानाचा अधिकार दिलाच गेला पाहिजे. अन्यथा घटना आणि कायद्याची पायमल्ली होऊ शकते. मूळ मतदारांना हक्क बजावण्यासाठी २०१७ मधील जिल्हा परिषद सदस्य,पंचायत समिती सभापती यांना मतदानाचा अधिकार द्यावा किंवा धाराशिव-बीड-लातूर मतदार संघाची निवडणूक स्थगित करावी. शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन बीड जिल्ह्याला न्याय द्यावा अशी आग्रहाची मागणी अशोक लोढा यांनी केली आहे.

## सौ. सावित्रीबाई आळणे यांचे दु:खद निधन

माजलगांव ।प्रतिनिधी

तालुक्यातील आदर्श नगर, चिंचगव्हाण येथील रहिवासी सौ. सावित्रीबाई नंदकुमार आळणे यांचे मंगळवार दि. २६ रोजी पहाटे ४ वाजता वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७० वर्षे होते.गेल्या दोन महिन्यांपासून त्या आजारी होत्या. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत असून आळणे परिवारावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

त्यांच्यावर मंगळवार दि. २६ रोजी सायंकाळी ४ वाजता माजलगांव येथील मंगलनाथ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्या माजलगांव येथील महाराष्ट्र पोलिस न्यूजचे प्रतिनिधी दत्ताराज आळणे यांच्या मातोश्री होत. तसेच शिवसेनेचे माजी नगरसेवक अशोक आळणे यांच्या त्या चुलती



होत.त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.अंत्यसंस्कारावेळी राजकीय, सामाजिक, वैद्यकीय, विधी क्षेत्रातील मान्यवरांसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आ.विजयसिंह पंडित यांनी बीड शहरातील विविध समस्यांचा प्रत्यक्ष ऑन दि स्पॉट जाऊन घेतला आढावा..!



बीड ।प्रतिनिधी

स्व.अजितदादांनी बीडकरांना दिलेला विकासाचा वादा पुर्ण करण्यासाठी आ.विजयसिंह पंडित यांनी पुढाकार घेत बीड शहरातील विविध समस्यांचा प्रत्यक्ष ऑन दि स्पॉट जाऊन आढावा घेतला. आ.विजयसिंह पंडित, नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे, प्रतिनिधी शेख मुजीब, उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, सभापती शेख निजाम आणि मुख्याधिकारी शैलेश फडसे, जेष्ठ नगरसेवक सय्यद सादेकुजमा, नगरसेवक महेश धांडे, शेख इकबाल यांच्यासह अन्य नगरसेवक, पदाधिकार्यांनी आज दुपारी नवी भाजी मंडई, सिध्दीविनायक संकुल, पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर पुतळा परिसर, जिव्हाळा निराधार केंद्र आदि ठिकाणी भेटी देऊन पाहणी केली. नवी भाजी मंडई स्वच्छ आणि प्रशस्त करू, सिध्दीविनायक संकुलातील नियोजित मंडईची इमारत उपयोगात आणण्याच्या दृष्टीने योग्य व्यवस्थापन करू, पुण्यश्लोक आहिल्यादेवींच्या पुतळ्याचे सुशोभीकरण करून जिव्हाळा केंद्रातील निराधारांना शासनाच्या संजय गांधी व इतर योजनेच्या माध्यमातून अनुदान मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू अशी ग्वाही आ.विजयसिंह पंडित यांनी दिली.

बीड शहरात आज दुपारी आ.विजयसिंह पंडित यांनी विविध ठिकाणी भेट दिली. नवी भाजी मंडई परिसरात बांधण्यात आलेले गाळे, ओट्यांची पाहणी केली. ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणात पडझड झालेली असुन त्याची दुरूस्ती करून स्वच्छतेसह प्रशस्त भाजी मंडई करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणार असल्याचे आ.पंडित यांनी सांगितले. यावेळी त्यांनी मंडईतील छोट्या-मोठ्या व्यवसायिकांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. सिध्दीविनायक संकुलातील नियोजित भाजी मंडईच्या इमारतीची पाहणी करून या ठिकाणी भाजी विक्रेते येणार असतील तर सर्व त्या सुविधा उपलब्ध करून देऊ किंवा ही जागा आणि इमारत अन्य काही कामाच्या अनुषंगाने वापरता येईल का ? हे देखील पाहु असे त्यांनी सांगितले. पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीच्या पार्श्वभुमीवर तातडीने सुशोभीकरण करून आवश्यक ती कामे हाती घेण्याच्या सुचना त्यांनी नगर पालिकेच्या यंत्रणेला केल्या. त्यानंतर आ.विजयसिंह पंडित यांनी नवी भाजी मंडईतील जिव्हाळा निवारा केंद्रात जाऊन तेथील निराधारांशी संवाद साधला. त्यांच्या समस्या जाणून घेत त्या निराधारांना शासनाच्या योजनेतून अनुदान मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू अशी ग्वाही दिली. एकूणच आ.विजयसिंह पंडित यांनी आणि नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे यांच्या टीमने तब्बल ३ ते ४ तास मॅरेथॉन पाहणी करून विविध समस्यांचा आढावा घेत विकासाच्या दृष्टीने महत्वाचे पाऊल टाकले आहे.

### खंडापूर पादुका दर्शन सोहळा आर्थिक व्यवहारातील दोषींवर कारवाईच्या मागणीसाठी

## अ .भा. भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या वतीने एमआयडीसी पोलीस ठाण्यासमोर ठिय्या आंदोलन

लातूर ।प्रतिनिधी

लातूर तालुक्यातील खंडापूर येथे दि. २२ फेब्रुवारी ते २ मार्च २०२६ या कालावधीत पार पडलेल्या उत्सव संतांचा, कुंभमेळा वारकऱ्यांचा पादुका दर्शन सोहळ्यासाठी देणगी स्वरूपात आलेल्या रकमेमध्ये कोट्यवधी रुपयांच्या अपहार प्रकरणी दोषी असणाऱ्या किशोर जाधव शिवणीकर व त्याच्या सहकाऱ्यांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याच्या मागणीसाठी मंगळवारी अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर यांच्या



नेतृत्वाखाली लातूरच्या एमआयडीसी पोलीस ठाण्यासमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले.

या पादुका दर्शन सोहळ्यात कोट्यवधी रुपयांचा अपहार करण्यात आल्याची तक्रार अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती एवं ब्रिक्स ह्युमन राईट मिशनचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर यांनी एका लेखी निवेदनाद्वारे लातूरच्या पोलीस अधीक्षकांकडे केली आहे.

.

अपहार करणाऱ्या तथाकथित किशोर जाधव शिवणीकर याच्यावर व त्याच्या या प्रकरणातील दोषी सहकाऱ्यांवर तात्काळ गुन्हे दाखल करून त्यांची सखोल चौकशी करण्यात यावी,अशी आग्रही मागणीही करण्यात आली.

या ठिय्या आंदोलनात स्वातंत्र्य सैनिक प्रदीप पाटील खंडापूरकर , पृथ्वीराज सिंह पाटील खंडापूरकर , अमोल नानजकर, एड. राणीताई स्वामी, रामभाऊ पवार, नेताजी जाधव, काशीबाई हांडे, रामेश्वर डोणे ,नागेश जाधव, जयश्री भुत्तेकर, सुरेखा गाडेकर, टीनाताई शिंदे, महेश चामे, तुषार रेड्डी, मोक्षदा भंडारकवटे, अमोल भालेराव, महेश पाटील, वैभव घोबाळे, पृथ्वीराज पवार आदिंसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### वादळी वाऱ्याचा इरला (म) परिसराला तडाखा

## आंब्यासह अनेक झाडे जमीनदोस्त व सोलार पंपाच्या सौर पॅनलचे प्रचंड मोठे नुकसान

प्रतिनिधी । माजलगाव

माजलगाव तालुक्यातील इरला (म) परिसरासह अनेक गावांना दिनांक २३ मे २०२६ रोजी सायंकाळी झालेल्या अवकाळी वादळी वाऱ्याचा मोठा तडाखा बसला*. सायंकाळी पाचच्या सुमारास अचानक आलेल्या जोरदार वाऱ्यामुळे परिसरातील जनजीवन काही काळ विस्कळीत झाले. वादळी वाऱ्याच्या तडाख्याने आंबा, लिंब, चिंच यांसारखी मोठमोठी झाडे उन्मळून पडली असून अनेक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे.

विशेषत: हातातोंडाशी आलेल्या आंब्याच्या बागांचे मोठे नुकसान झाल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. अनेक ठिकाणी फळांनी लगडलेली आंब्याची झाडे मुळासकट कोसळली, तर काही ठिकाणी झाडांच्या मोठमोठ्या फांद्या तुटून पडल्याने बागांचे मोठे नुकसान झाले. याशिवाय वाऱ्यामुळे काही ठिकाणी वीजवाहिन्याही खंडित झाल्याची व

सोलार पंपाच्या सौर पॅनलचे नुकसान झाले आहे अशी माहिती इरला ग्रामस्थांकडून देण्यात आली आहे

माहिती मिळाली आहे.

अवकाळी पावसासह आलेल्या या वादळी वाऱ्यामुळे शेतकऱ्यांचे आधीच संकटात असलेले अर्थकारण आणखी डळमळीत झाले आहे. मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या वातावरणातील बदलामुळे शेतकरी चिंतेत असतानाच या नैसर्गिक आपत्तीने त्यांच्या अडचणीत भर घातली आहे. अनेक शेतकऱ्यांनी आपल्या



बागांचे पंचनामे करून शासनाकडून तातडीने नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे.

दरम्यान, प्रशासनाने नुकसानग्रस्त भागांची पाहणी करून तातडीने मदत जाहीर करावी, अशी मागणी परिसरातील नागरिक व शेतकऱ्यांकडून होत आहे.

### प्राचार्य सलगरे यांचे साहित्य माणुसकीचा धर्म शिकवणारे

## डॉ. जयद्रथ जाधव, जीवनधर्म चिकित्सा भूगोलासह ग्रंथाचे लातुरात प्रकाशन

लातूर ।प्रतिनिधी

सिध्दहस्त साहित्यिक प्राचार्य मधुकर सलगरे यांचे साहित्य हे माणुसकीचा धर्म शिकवणारे आहे. त्यांच्या प्रत्येक ग्रंथात तर्कशास्त्राचा अभ्यास करुन जीवन उपयोगी माहिती देण्यात आली आहे असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. जयद्रथ जाधव यांनी केले.

राजे मल्हारराव होळकर ट्रस्ट लातूरतर्फे ग्रंथ प्रकाशन आणि पुरस्कार वितरण समारंभ लातूरमधील भालचंद्र ब्लड बँक सभागृहात आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दिव्य मराठीचे स्टेट हेड सुभाष बोंद्रे हे उपस्थित होते. या समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून




डॉ. सोपानराव जटाळ, डॉ. राजेश पाटील, डॉ. हनुमंत किनीकर, डॉ. हमीद चौधरी, अशोकराव काळगे, डॉ. लक्ष्मण शिवणेकर, प्रवीण देशमुख, अशोक नारनवरे आदी उपस्थित होते. या समारंभात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींना उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल राजे मल्हारराव होळकर ट्रस्टच्या वतीने पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. यामध्ये डॉ. शिवणेकर, डॉ. हमीद चौधरी, प्रवीण देशमुख, डॉ. हनुमंतराव किनीकर, डॉ. अशोक नारनवरे, साधनाताई शेटे, संभाजीराव सूळ, अमोल पांढरे, चन्नवीर भद्रेश्वरमठ आदींचा समावेश होता.या समारंभात डॉ. अशोक नारनवरे, डॉ. लक्ष्मण शिवणेकर, डॉ. हमीद चौधरी आदींनी मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. मधुकर सलगरे यांनी प्रास्ताविक करुन ग्रंथाविषयी भूमिका मांडली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिता खडके यांनी केले तर आभार चंद्रकांत हजारे यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सतीश मोरे, उज्ज्वलकुमार माने, उमेश घोडके, अनिता खडके, मनोज अंबुरे, सुधीर भास्करे, राजपाल भंडे, साई सलगरे, नरसिंग काळे, प्रणव रणदिवे, प्राजक्ता रणदिवे आदींनी परिश्रम घेतले.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# तर धुळ खात पडलेली भाजी मंडई इमारत वापरात आणणार - आ. विजयसिंह पंडित

## जिव्हाळा बेघरनिवाऱ्यातील निराधारांना हक्काचे घर देणार..!

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या पुतळ्याचे सुशोभिकरण होणार

सिध्दीविनायक कॉम्प्लेक्स परिसरातील भाजी मंडई इमारतीची पाहणी केल्यानंतर रखरखत्या उन्हात आ. विजयसिंह पंडित यांच्यासह नगराध्यक्ष श्रीमती प्रेमलताताई पारवे आणि पालिकेतील पदाधिकारी व अधिकारी कर्मचारी यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळा परिसराची पाहणी केली. यावेळी उपस्थितांनी काही सूचना आणि प्रश्न उपस्थित केल्यानंतर या बाबत आराखडा तयार करून त्यावर शहरातील नागरीकांच्या प्रतिक्रिया समजावून घेतल्यानंतर पुतळ्याचे सुशोभिकरण करण्याचा निर्णय यावेळी उपस्थितांनी घेतला. यासाठी निधीची कमतरता पडू देणार अशी ग्वाही आ. विजयसिंह पंडित यांनी दिली.





बीड ।प्रतिनिधी

वृध्द महिला भाजी विक्रेतीवर झालेल्या अन्यायाची पुनरावृत्ती होवू नये म्हणून भाजी विक्रेत्यांना हक्काची जागा उपलब्ध करण्यासाठी आ. विजयसिंह पंडित यांनी सिध्दीविनायक कॉम्प्लेक्स समोरील भाजी मंडई इमारतीची पाहणी केली. या इमारतीत भाजीपाला विक्रेते, फळविक्रेते आणि व्यापाऱ्यांना एका छताखाली सुरक्षित, स्वच्छ आणि सर्व सुविधा उपलब्ध करून देता येतील का या संदर्भाने त्यांनी प्रत्यक्ष भाजी मंडई इमारतीमध्ये जावून सर्व प्रतिनिधींशी तपशिलवार चर्चा केली. जालना रोड ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुतळ्यापर्यंतच्या रस्त्याच्या कामाला भेट दिली. जिव्हाळा या बेघर निवारा केंद्रात जाऊन आ. पंडित यांनी तेथील निराधारांशी संवाद साधून भविष्यात बेघरांना हक्काचे घर उपलब्ध करून देण्याचा शब्द दिला. यावेळी त्यांच्या समवेत नगराध्यक्षांसह पदाधिकारी उपस्थित होते.सोमवार, दि.२५ रोजी आ. विजयसिंह पंडित यांच्यासह बीड नगर परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी शहरातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर भाजी मंडई, सिध्दीविनायक कॉम्प्लेक्स समोरील भाजी मंडई इमारत, जिव्हाळा या बेघर निवारा केंद्रासह जालना रोड ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यापर्यंत सुमारे २ कोटी रुपये किंमतीच्या रस्त्याच्या कामाची स्थळ पाहणी केली. नुकत्याच वृध्द महिला भाजी विक्रेतीवर झालेल्या अन्यायानंतर पालिका प्रशासनाने केलेल्या या पाहणीला अनन्य साधारण महत्व आहे. यावेळी आ. विजयसिंह पंडित यांच्यासमवेत नगराध्यक्ष श्रीमती प्रेमलताताई पारवे, नगराध्यक्ष प्रतिनिधी शेख मुजीब, उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, सभापती शेख निजाम, मुख्याधिकारी शैलेश फडसे, ज्येष्ठ नगरसेवक सादेक जमा, नगरसेवक ड.महेश धांडे, शेख बिलाल, शेख इकबाल, नगरसेवक मनोज गोडसे, नगरसेवक भिमराव वाघचौरे, नगरसेवक भैय्यासाहेब मोरे, नगरसेवक प्रमोद शिंदे, माजी नगरसेवक व व्यापारी प्रतिनिधी भास्करराव जाधव, जल्लूभाई, महेश राऊत, अनंत पवार यांच्यासह बीड नगर पालिकेचे अधिकारी कर्मचारी


### भाजीपाला विक्रेत्यांनी नियोजित ठिकाणी बसावे..

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर भाजी मंडई परिसरात भाजीपाला विक्रेते, फळ विक्रेते यांच्यासाठी बांधण्यात आलेल्या ओटे व शेडमध्ये कोणीच बसत नाही. याठिकाणी सर्वत्र दुर्गंधी व घाणीचे ढिगोरे पडल्याचे आ. विजयसिंह पंडित यांना पाहणी दरम्यान आढळून आले. यावर तातडीने याची स्वच्छता व इतर मुलभूत सुविधा तातडीने याठिकाणी देऊन भाजीपाला, फळे व शेतकऱ्यांनी नियोजित ठिकाणी बसावे यासाठी सहकार्य करणे आवश्यक आहे. या बाबत सर्वांची एकत्र बैठक घेऊन योग्य मार्ग काढून शहराच्या विकासासाठी पुढे जावे लागेल असे सांगत सर्वांनी सहकार्य करावे असे आवाहनही यावेळी आ. पंडित यांनी केले.

---

# कर्मवीर एकनाथ आवाड यांच्या स्मृतीदिनानिमित्त शिक्षण संवाद यात्राचा समारोप

## साठ गावांत फिरून अमोल शेरकर यांनी मातंग समाजात शिक्षणाची जनजागृती



माजलगाव ।प्रतिनिधी

मातंग समाजातील शिक्षणाबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने मातंग समाजाचे नेते अमोल शेरकर यांनी सुरू केलेल्या शिक्षण संवाद यात्राचा समारोप कर्मवीर एकनाथ आवाड यांच्या स्मृतीदिनानिमित्त आज, दि. २५ मे रोजी तेलगाव येथे करण्यात आला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनी त्यांच्या स्मारकाला अभिवादन करून या यात्रेची सुरुवात करण्यात आली होती. मागील दीड महिन्यापासून माजलगाव, वडवणी आणि धारूर तालुक्यातील तब्बल ६० गावांमध्ये ही यात्रा पोहोचली. गावोगावी जाऊन मातंग समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे, शिक्षण गळतीची कारणे समजून घेणे आणि समाजात शैक्षणिक वातावरण निर्माण करणे हा यात्रेचा प्रमुख उद्देश होता.

या यात्रेदरम्यान मातंग समाजातील अनेक कुटुंबांशी संवाद साधण्यात आला. समाज शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून दूर का राहतो, तरुण पदवीधर झाल्यानंतर पुढील शिक्षण किंवा स्पर्धा परीक्षांकडे का वळत नाहीत, यासारख्या प्रश्नांवर चर्चा करून त्यावर उपाययोजना शोधण्याचा प्रयत्न करण्यात आला.

अमोल शेरकर यांनी विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या अधिकारी व मार्गदर्शकांची व्याख्याने मांगवाड्यांमध्ये आयोजित करून विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्याचे काम केले. समाजातील प्रत्येक लेकरू शिकले पाहिजे, अधिकारी झाले पाहिजे आणि समाजाची प्रतिष्ठा वाढवली पाहिजे, हा यात्रेमागील मुख्य विचार असल्याचे त्यांनी सांगितले.

या यात्रेमुळे मातंग समाजात निश्चितच शैक्षणिक जागृती निर्माण होईल आणि भविष्यात समाजातील अनेक विद्यार्थी उच्च शिक्षणाकडे वळतील, अशी भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.या शिक्षण संवाद यात्रेसाठी ड. स. स. कसबे, विक्रम वाघमारे, विशाल गवळी, शंकर आलाट, केतन लोखंडे, महाराज थोरात, विकास जाधव, अभिषेक हातागळे, अशोक जाधव, करण भिसे, विजय शेरकर, प्रदीप दळवी, संदीप भिसे आणि कृष्णा कांबळे यांनी विशेष परिश्रम घेतले. या समारोप कार्यक्रमाला विक्रम वाघमारे , रणजीत पाटोळे ,विशाल गवळी अभिषेक हातागळे , मच्छिंद्र उपाडे, अक्षय गवळी , विकास जाधव ,कैलास गायकवाड विजय शेरकर सह कार्यकर्ते उपस्थित होते ..!!

# श्रामनणेर शिबिरातून समता, संयम व शिस्तीचे उत्तम संस्कार मिळतात - अमरसिंह ढाका

## चैत्यभूमी श्रामनेर शिबिरार्थीचा धम्मदीप बुद्ध विहारात सत्कार



बीड ।प्रतिनिधी

श्रामणेर शिबिरातून समता, संयम व शिस्तीचे उत्तम संस्कार मिळतात असे उद्गार अमरसिंह ढाका यांनी मुंबई येथे श्रामनेर शिबिरात सहभाग नोंदवलेल्या शिबिरार्थींच्या धम्मदीप बुद्ध विहार येथील सत्कार प्रसंगी अनुभव सांगताना प्रतिपादन केले. तथागतांचे तत्वज्ञान त्यांच्या वाणीतून निघालेल्या अनमोल पाली भाषेतील गाथेतून समजतात. गृहस्थी जीवनातील उपासक-उपासिका व बालकाकरता त्यांचे तत्त्वज्ञान समजण्याकरिता भारतीय बौद्ध महासभेने चैत्यभूमी दादर मुंबई येथे दहा दिवसीय श्रामनेर शिबिर आयोजित केले होते. त्या शिबिरात बीड शहरातील भारतीय बौद्ध महासभेचे राज्य संघटक आयु.अमरसिंह ढाका. ड हनुमंत कांबळे जिल्हा पर्यटक संघटक बीड,ड चंद्रवदन जाधव धम्म महासंघ अध्यक्ष बीड यांनी सहभाग नोंदवून शिबिरातील आपले अनुभव उपस्थित उपासक -उपासिकांना श्रामनेर शिबिरात सहभाग नोंदवणे कसे गरजेचे आहे हे समजावून सांगून त्यांना श्रामनेर शिबिरात सहभाग नोंदवण्यास प्रेरित केले. सत्कार कार्यक्रम प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून आयु.बी. एम. जोगदंड, प्रमुख पाहुणे म्हणून बालाघाट येथील श्रामनेर शिबिर संपन्न करून आलेले प्राध्यापक बी.पी सिरसट लाभले होते. महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम भोले, वाचाल तर वाचाल चे अध्यक्ष डी.जी वानखेडे, ड तेजस वडमारे, काशिनाथ वाघमारे, यांची उपस्थिती होती कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक समता सैनिक दलाचे मेजर जनरल कॅप्टन राजाभाऊ आठवले यांनी केले. यावेळी धोंडामाय कांबळे यांचे वृद्धापकाळाने नुकतेच निधन झाले त्यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन ड तेजस वडमारे यांनी व्यक्त केले तर अंजली वडमारे व धम्मदीप महिला मंडळ ग्रुप ने कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता बहुमोल परिश्रम घेतले. कार्यक्रमास अर्चना जाधव, आशाबाई भालेराव, हर्षदा भोसले, सिद्धी भालेराव, पृथ्वी भालेराव बहुसंख्य उपासक उपासिकांची उपस्थिती होती सरणातयणे कार्यक्रमाची सांगता झाली.

---

# स्व. गोपीनाथराव मुंडे यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवा - जिल्हा प्रभारी सुनील राणे



## भाजपा बीड जिल्ह्याचे दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिर ठाणे जिल्ह्यात उत्साहात प्रारंभ

मुंबई/मिरा भाईंदर प्रतिनिधी

पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण अभियानांतर्गत भारतीय जनता पार्टी बीड जिल्ह्याचे दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिर ठाणे जिल्ह्यातील मिरा भाईंदर येथील रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या निसर्गरम्य परिसरात उत्साहपूर्ण वातावरणात प्रारंभ झाले. भाजपा बीड जिल्हा प्रभारी तथा आमदार सुनील राणे यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना सुनील राणे म्हणाले, स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांचा चेहरा डोळ्यासमोर आणला तरी कार्यकर्ता कसा असावा, पक्षासाठी त्याग, संघर्ष आणि निष्ठेने काम कसे करावे याची प्रेरणा मिळते. भाजपा आज मोठा पक्ष झाला असला तरी त्यामागे मुंडे-महाजन जोडीचे अथक परिश्रम आहेत, हे विसरून चालणार नाही.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ड.वाल्मिकराव निकाळजे होते. व्यासपीठावर जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख, योगेश क्षीरसागर, राम कुलकर्णी, सर्जेराव तात्या तांदळे, नवनाथ आण्णा शिराळे आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रास्ताविकात जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांनी जिल्हा भाजपा संघटनेच्या कार्याचा आढावा घेत शिबिरासाठी अपेक्षित शंभर टक्के कार्यकर्ते उपस्थित राहिल्याबद्दल समाधान व्यक्त केले. तसेच हे शिबिर मा. ना. पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली होत असल्याचे त्यांनी सांगितले.

स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्यासोबत मुंबईत २५ वर्षे कार्य केलेल्या सुनील राणे यांनी आपल्या भाषणात अनेक आठवणींना उजाळा दिला. राजकीय स्वार्थ बाजूला ठेवून सेवाभाव, वैचारिक निष्ठा आणि संघटन वाढीसाठी काम करणारा कार्यकर्ता पक्षाचा खरा आधार असतो, असे ते म्हणाले.

भाजपमध्ये सामूहिक नेतृत्वाची परंपरा असून सर्वधर्म समभाव ही पक्षाची संस्कृती असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. कार्यक्रमाची सुरुवात वंदे मातरम् आणि महाराष्ट्र गीताने झाली. मान्यवरांचा परिचय मुन्ना फड यांनी करून दिला.

महाराष्ट्र भाजपा प्रदेश संघटनेच्या वतीने राज्यभर जिल्हानिहाय प्रशिक्षण वर्ग सुरू आहेत. बीड जिल्ह्याचा वर्ग कुठे आयोजित करायचा याबाबत चर्चा सुरू असताना जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांनी मिरा भाईंदर येथील रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीची निवड केली. ना. पंकजाताई मुंडे आणि माजी खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या शिबिरात कार्यकर्त्यांसाठी उत्कृष्ट निवास, वैचारिक वातावरण आणि शिस्तबद्ध नियोजन करण्यात आल्याने जिल्हाध्यक्षांच्या भूमिकेचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.


# नेकनूर पोलीस ठाण्याचे नवीन सहाय्यक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे यांचे स्वागत



नेकनूर ।प्रतिनिधी

नेकनूर पोलीस ठाण्याच्या नवीन सहाय्यक पोलीस निरीक्षक पदाचा पदभार स्वीकारल्याबद्दल मंगेश साळवे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. पदभार स्वीकारल्यानंतर आयोजित करण्यात आलेल्या एका छोटेखानी कार्यक्रमात, सामाजिक/राजकीय नेते सलामन नेते यांनी नवनियुक्त एपीआय मंगेश साळवे यांचा पुष्पगुच्छ देऊन जाहीर सत्कार केला.

मंगेश साळवे साहेब आपल्या नवीन जबाबदारीला योग्य न्याय देतील आणि त्यांच्या कार्यकाळात नेकनूर परिसरातील कायदा व सुव्यवस्था अधिक मजबूत होईल,असा विश्वास यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला.



**दिंद्रुड - मानवी हक्क अभियानाचे संस्थापक अध्यक्ष कर्मवीर एकनाथरावजी आवाड यांना स्मृतिदिनानिमित्त तेलगाव येथे सोमवारी अभिवादन करण्यात आले. यावेळी नगरसेवक रणधीर कांबळे, रमेश बाप्पा गवळी, किसन लोखंडे, ग्रामपंचायत सदस्य अक्षय गवळी, अभिजीत जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी कर्मवीर एकनाथरावजी आवाड यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.**

# देवस्थान इनाम कायद्याविरोधात बीडमध्ये वारकरी दिंडी

## कायदा रद्द करण्याची जोरदार मागणी, महंतांची लक्षणीय उपस्थिती

बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्र सरकारच्या महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन अधिनियम २०२६ या प्रस्तावित कायद्याविरोधात बीड शहरात सकल वारकरी समाज व मंदिर संरक्षण समितीच्या वतीने वारकरी, भाविक, श्रद्धाळू आणि हिंदू धर्मप्रेमींनी जोरदार आंदोलन छेडले.

हिंदू धर्मातील पुरातन मंदिरे, देवस्थान, मठ, गड आणि संस्थानांच्या जमिनी संपुष्टात आणण्याचा सरकारचा डाव असल्याचा आरोप करत हा प्रस्तावित कायदा तात्काळ रद्द करावा, या प्रमुख मागणीसाठी मंगळवारी (दि.२६) छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय अशी भव्य वारकरी दिंडी काढण्यात आली. जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले.

टाळ-मृदुंगाच्या गजरात आणि विठ्ठल नामाच्या जयघोषात निघालेल्या दिंडीने शहराचे वातावरण भक्तिमय झाले होते. आंदोलनकर्त्यांनी देवस्थान जमीन वाचवा, हिंदू धर्मावरील अन्याय बंद करा अशा घोषणा देत शासनाचा निषेध नोंदविला.या वारकरी दिंडीत महंत ह.भ.प. लक्ष्मण महाराज मेंगडे (बंकट




स्वामी संस्थान, नेकनूर आळंदी पंढरपुरी), महंत ह.भ.प. संभाजी महाराज (उत्तराधिकारी, श्रीक्षेत्र नारायणगड), महंत ह.भ.प. तुकाराम महाराज भारती (बेलेश्वर संस्थान, बेलगाव), रामायणाचार्य ह.भ.प. नाना महाराज कदम, ह.भ.प. सुरेश महाराज जाधव, ह.भ.प. त्रिंबक महाराज मातकर, ह.भ.प. रामेश्वर महाराज जाधव, ह.भ.प. श्रीकृष्ण महाराज उबाळे, ह.भ.प. गोकुळ महाराज उबाळे आदी महंतांची लक्षणीय उपस्थिती होती.तसेच या दिंडीत पांडुरंग महाराज शिंदे, लोखंडे महाराज, ओमतात्या खवतड, सिताराम महाराज, गजानन जोशी, मुकुंदराव खडकीकर, रविंद्र कुलकर्णी, शरद कुलकर्णी, प्रणव राखे, स्वामी महाराज हातळे, श्रीकृष्ण खोसे, महेश मुळीक, जनार्दन महाराज ढेरे, विष्णु घोलप, सुंदर नांगरे, रामहरी घोडके, लग्न महाराज गाडे, अक्षय महाराज मस्के, शरद घोलप, सामाजिक कार्यकर्ते गणेश ढवळे, रामनाथ खोड, शेख युनुस, बाजीराव ढाकणे, राजेंद्र आमटे, संजय शिंदे यांच्यासह मोठ्या संख्येने वारकरी, हिंदूप्रेमी, श्रद्धाळू आणि भाविक सहभागी झाले होते.

## बकरी ईदनिमित्त २८ मे रोजी शासकीय रुग्णालयांची 'ओपीडी' बंद

लातूर ।प्रतिनिधी

काही दिनदर्शिकांमध्ये बुधवार, २७ मे २०२६ रोजी बकरी ईदची सुट्टी दर्शवण्यात आली असली, तरी महाराष्ट्र शासनाने बकरी ईदची सार्वजनिक सुट्टी गुरुवार, २८ मे २०२६ रोजी निश्चित केली आहे. त्यामुळे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभाग गुरुवार, २८ मे २०२६ रोजी बंद राहील.

शासकीय रुग्णालयांचा बाह्यरुग्ण विभाग बुधवार, २७ मे २०२६ रोजी नियमित वेळेप्रमाणे पूर्णवेळ सुरू राहील, तर गुरुवार, २८ मे रोजी सुट्टी असल्याकारणाने पूर्णपणे बंद राहणार आहे. शासकीय रुग्णालयातील ओपीडी विभाग गुरुवारी बंद असला, तरी रुग्णालयाची आपत्कालीन सेवा २४ तास अविरत सुरू राहील, असे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. संतोषकुमार डोपे यांनी कळविले आहे.

## स्थानिक प्राधिकारी मतदार संघाच्या निवडणुकीसाठी एक उमेदवारी अर्ज दाखल

बीड ।प्रतिनिधी

उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदार संघाची निवडणूक सूचना दिनांक २५.०५.२०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. त्यानुसार दिनांक २५ मे रोजी १० व्यक्तींनी १७ नामनिर्देशन अर्ज व दिनांक २६ मे रोजी ८ व्यक्ती यांनी १६ असे एकूण ३३ नामनिर्देशन अर्ज प्राप्त करून घेतलेले आहेत. तसेच दिनांक २६ मे रोजी १ (एक) नामनिर्देशन अर्ज प्राप्त झालेला आहे.

नामनिर्देशपत्रे उमेदवाराला किंवा त्याच्या कोणत्याही प्रस्तावकाला निवडणूक निर्णय अधिकारी, उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ तथा जिल्हाधिकारी धाराशिव, यांचेकडे दिनांक १ जून, २०२६ (सोमवार) पर्यंत कोणत्याही दिवशी (शासकीय सुट्टी व्यतीरिक्त) सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंतच्या कालावधीत जिल्हाधिकारी धाराशिव यांचे कार्यालयातील जिल्हाधिकारी यांचे दालन येथे दाखल करता येतील.

## आचारसंहितेमुळे १ जून रोजीचा जिल्हास्तरीय लोकशाही दिन स्थगित

लातूर ।प्रतिनिधी

लातूर जिल्ह्यात दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी आयोजित करण्यात येणारा जिल्हास्तरीय लोकशाही दिन स्थगित करण्यात आला आहे. सद्यस्थितीत महाराष्ट्र विधान परिषदेच्या उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणूक-२०२६ ची आदर्श आचारसंहिता लागू आहे.

या आचारसंहितेच्या अंमलबजावणीमुळे आगामी सोमवार, १ जून २०२६ रोजी जिल्हास्तरीय लोकशाही दिन आयोजित केला जाणार नाही, अशी माहिती लातूरचे प्रभारी उपजिल्हाधिकारी (सामान्य) गणेश पवार यांनी दिली आहे.

## अंबड तालुका ग्रामीण पत्रकार संघांच्या अध्यक्षपदी अनंत मुंडे ,उपाध्यक्षपदी मोहन रोटे तर सचिव पदी पवन पवार यांची निवड

घुंगर्डे हादगाव ( प्रतिनिधी)

अंबड तालुक्यातील ग्रामीण पत्रकारांचे संघटित प्रयत्न आज एक नवा आयाम घेऊन समोर आले आहेत. वडीगोद्री येथे आयोजित झालेल्या बैठकीत तालुका ग्रामीण पत्रकार संघाच्या नवीन कार्यकारणीची अधिकृत घोषणा करण्यात आली. संघाचे अध्यक्षपद अनंत मुंडे यांना, उपाध्यक्षपदी मोहन रोटे यांना आणि सचिवपदी पवन पवार यांची निवड करण्यात आली. यावेळी अन्य पदांवरही गावोगावी परिचित असलेल्या पत्रकारांची निवड झाली. या निवडी बद्दल सर्वांचे अभिनंदन करण्यात आले.

बैठकीचे आयोजन स्थानिक पत्रकारांद्वारे केले होते आणि तेथे अनेक ग्रामीण पत्रकार, उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात स्वागतप्रमुखाच्या उपस्थितीत करण्यात आली, त्यानंतर संघटनेच्या कार्याची रूपरेषा आणि पुढील उपक्रम यावर सविस्तर चर्चा झाली आहे.




या कार्यकारणीत दिलीपराव पवार,दिलीपराव दखने, रविंद्र घाडगे, रोहिदास पवार, राजेंद्र छल्लारे,सुरेश काळे, राजेंद्र पवार,किर्तीनंद गांगुर्डे, पांडुरंग सोळुंके,चक्रधर नाटकर, रमेश सुरवसे,फकीर मोहम्मद बागवान, शैलेश मरकड, प्रवीण काळे,अशोक चांगले,अशोक गायकवाड, बंडू शिंगटे, मुकेश डूचे,सुदर्शन गावडे,कृष्णा आगलावे, रजनीश कणके, कैलास खरात रामकिसन अवधूत आदी चा समावेश आहे.

# पत्रकारितेची गुणवत्ता आणि दर्जा महत्त्वाचा-उत्तम बोडखे

### प्रवीण पोकळे,अनिरुद्ध धर्माधिकारी यांचे अभिष्टचिंतन

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) लोकशाही व्यवस्था सर्वोत्तम असते. अशा लोकशाही व्यवस्थेमध्ये लोकशाहीची मूल्य प्रत्यक्षात तंतोतंत अवलंबण्याच्या हेतूने अनेक जे आधार असतात त्यात पत्रकारिता हा एक महत्त्वाचा भाग आहे. लेखन आणि पत्रकारिता क्षेत्रात गुणवत्ता आणि दर्जा अत्यंत महत्त्वाचा असतो. तो दै. प्रजापत्र व दै. सकाळच्या माध्यमातून प्रवीण पोकळे आणि अनिरुद्ध धर्माधिकारी यांनी आजपर्यंत राखला आहे असा गौरव ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे यांनी केला.

आष्टी तालुक्यातील प्रजापत्र चे तालुका प्रतिनिधी प्रवीण पोकळे आणि दैनिक सकाळचे तालुका प्रतिनिधी अनिरुद्ध धर्माधिकारी यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने पत्रकारिता, शिक्षण, सामाजिक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या वतीने त्यांचे अभिष्टचिंतन करण्यात आले.

आजपर्यंतच्या त्यांच्या प्रामाणिक उत्कृष्ट कार्य कर्तुत्वाचा या निमित्ताने वेध घेण्यात आला. यावेळी पत्रकार बांधवांच्या वतीने प्रतिनिधी स्वरूपात शुभेच्छा देऊन सन्मान करताना ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी जेष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे हे होते. तसेच याप्रसंगी तालुक्यातील विविध पत्रकार बांधव यांनी शुभेच्छा दिल्या.



उत्तम बोडखे पुढे म्हणाले की, पत्रकारितेसमोर आज मोठ्या प्रमाणावर आव्हाने निर्माण झाली आहेत. त्यातून यशस्वीपणे पुढे जाण्याचे कर्तव्य बजावण्यासाठी पत्रकार हा सजग, जागृत, सक्षम, स्वाभिमानी आणि अभ्यासू असला पाहिजे, किंबहुना लेखनातील दर्जा आणि गुणवत्ता सर्वश्रेष्ठ असली पाहिजे अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली. पत्रकारितेकडे समाज एका अपेक्षेने पाहत असतो. या अपेक्षा फोल न ठरता त्या अपेक्षांची पूर्ती होईल तेंव्हाच पत्रकारिता यशस्वी कर्तव्य बजावते असा त्याचा अर्थ होऊ शकेल, म्हणून सर्व पत्रकार बांधवांनी सत्य बातमीच्या माध्यमातून समता, बंधुत्व, ऐक्य आणि सर्वधर्म समभाव तसेच राष्ट्राला योग्य दिशा देण्यासाठी सर्वांच्या सक्षम आणि योग्य लेखणीची गरज आहे. यावेळी प्रवीण पोकळे आणि अनिरुद्ध धर्माधिकारी यांना विविध क्षेत्रातील मान्यवरांनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष, विविध माध्यमांच्या रूपाने शुभेच्छा देत अभिष्टचिंतन केले.

## पत्रकार अनिरुद्ध धर्माधिकारी,नितीन कांबळे व प्रवीण पोकळे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा



लेखणीची धार,सत्याची बाजू आणि समाजप्रबोधनाचा वसा

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) पत्रकारिता ही लोकशाहीचा चौथा स्तंभ मानली जाते. समाजातील प्रश्नांना वाचा फोडणे, प्रशासनाला जबाबदार धरणे आणि सत्य जनतेसमोर आणणे हे पत्रकारितेचे महत्त्वपूर्ण कार्य आहे. अशा जबाबदारीने पत्रकारिता करत आपल्या लेखणीच्या बळावर समाजात वेगळी ओळख निर्माण करणारे दैनिक सकाळचे पत्रकार अनिरुद्ध धर्माधिकारी, दैनिक लोकमतचे पत्रकार नितीन कांबळे आणि दैनिक प्रजापत्रचे पत्रकार प्रवीण पोकळे यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

दैनिक प्रजापत्रचे पत्रकार प्रवीण पोकळे यांचा वाढदिवस दिनांक २५ मे २०२६ रोजी साजरा झाला, तर दैनिक सकाळचे पत्रकार अनिरुद्ध धर्माधिकारी आणि दैनिक लोकमतचे पत्रकार नितीन कांबळे यांचा वाढदिवस २६ मे २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात विविध स्तरांवर साजरा करण्यात आला. यानिमित्त मित्रपरिवार, सहकारी पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, विविध क्षेत्रातील मान्यवर आणि नागरिकांनी त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला.

पत्रकार अनिरुद्ध धर्माधिकारी, नितीन कांबळे आणि प्रवीण पोकळे हे आष्टी तालुक्यातील नावाजलेले, अभ्यासू आणि सुप्रसिद्ध पत्रकार म्हणून ओळखले जातात. त्यांच्या लेखणीला नेहमीच धार असून सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, राजकीय तसेच जनसामान्यांच्या प्रश्नांवर त्यांनी सातत्याने सखोल आणि परखड वृत्तांकन केले आहे. आपल्या-आपल्या दैनिकातून त्यांनी अनेक गंभीर विषयांचा पाठपुरावा करत लोकहिताचे प्रश्न प्रभावीपणे मांडले आहेत.

विशेष म्हणजे, आष्टी तालुक्यातील अनेक प्रश्नांना त्यांनी आपल्या लेखणीतून वाचा फोडली असून प्रशासनाचे लक्ष वेधण्याचे महत्त्वपूर्ण काम केले आहे. त्यांच्या अनेक बातम्यांची प्रशासनाने दखल घेत विविध समस्यांवर कार्यवाहीही केली आहे. समाजहिताला प्राधान्य देत सडेतोड आणि निर्भीडपणे प्रश्न मांडण्याच्या त्यांच्या भूमिकेमुळे त्यांनी पत्रकारितेत स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.पत्रकारितेतील अनेक वर्षांच्या अनुभवामुळे सामाजिक घडामोडी, प्रशासनिक प्रश्न, जनतेच्या समस्या आणि विकासाच्या मुद्द्यांवर त्यांची भक्कम पकड दिसून येते. आपल्या लिखाणातून सत्याची बाजू ठामपणे मांडण्याचा प्रयत्न त्यांनी सातत्याने केला असून त्यांच्या वृत्तांकनाचा दर्जा नेहमीच उल्लेखनीय राहिला आहे. त्यामुळेच वाचकांमध्ये त्यांच्या बातम्यांना विशेष विश्वासार्हता प्राप्त झाली आहे.समाजातील विविध प्रश्नांवर प्रकाश टाकत लोकशाही बळकट करण्याचे कार्य त्यांच्या लेखणीतून पुढेही घडत राहो, त्यांच्या पत्रकारितेला उत्तरोत्तर अधिक बळ मिळो आणि भावी वाटचाल यशस्वी ठरो, अशा भावना व्यक्त करत सर्व स्तरांतून तिनही पत्रकारांवर वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला. तिनही पत्रकारांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा तसेच त्यांच्या भावी वाटचालीस दै. समर्थ राजयोग परिवाराकडून मनःपूर्वक शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

## प्रा.डॉ.शाम सांगळे यांच्या सेवापूर्ती सोहळ्याचे दि.३० मे रोजी भव्य आयोजन

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) शिक्षण क्षेत्रात दीर्घकाळ प्रामाणिकपणे सेवा बजावत विद्यार्थ्यांच्या बौद्धिक जडणघडणीत महत्त्वपूर्ण योगदान देणारे आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा येथील ग्रंथपाल प्रा. डॉ. शाम तुकाराम सांगळे यांच्या सेवापूर्तीनिमित्त गौरव ग्रंथ प्रकाशन व सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा शनिवार, दि. ३० मे २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता महाविद्यालय परिसरात मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे.

आनंद चॅरिटेबल संस्था, आष्टी संचलित आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा येथे होणाऱ्या या विशेष कार्यक्रमात प्रा. डॉ. शाम तुकाराम सांगळे यांच्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवेला सलाम करत त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात येणार आहे.

महाविद्यालयातील ग्रंथपाल म्हणून त्यांनी अनेक वर्षे ज्ञानसंपदेचे जतन, विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती रुजविणे, संशोधनवृत्ती वाढीस लावणे तसेच शैक्षणिक मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्याचे कार्य केले आहे. त्यांच्या सेवेमुळे अनेक विद्यार्थ्यांना ज्ञानाचा भक्कम पाया लाभला असून महाविद्यालयाच्या शैक्षणिक प्रगतीत त्यांनी मोलाचा वाटा उचलला आहे.

या गौरव सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी मा. आ. ॲड. भीमरावजी धोंडे साहेब, संस्थापक अध्यक्ष, आनंद चॅरिटेबल संस्था, आष्टी हे राहणार आहेत. कार्यक्रमाचे संयोजन प्राचार्य डॉ. एच. जी. विधाते यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले असून, आनंद चॅरिटेबल संस्थेचे सर्व प्रशासकीय अधिकारी, प्राध्यापक, ग्रंथालय



कर्मचारी, शिक्षकेतर कर्मचारी व महाविद्यालय परिवार कार्यक्रमासाठी विशेष परिश्रम घेत आहेत.

सेवापूर्तीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या गौरव ग्रंथ प्रकाशन सोहळ्यात प्रा. डॉ. शाम तुकाराम सांगळे यांच्या शैक्षणिक, वैचारिक, सामाजिक व ग्रंथालय क्षेत्रातील योगदानाचा आढावा घेणाऱ्या विशेष गौरव ग्रंथाचे प्रकाशन करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लावणारे, ज्ञानाचा खजिना खुला करून देणारे आणि शैक्षणिक मूल्यांची जपणूक करणारे ग्रंथपाल म्हणून त्यांची ओळख विशेष राहिली आहे. कार्यक्रमानंतर उपस्थितांसाठी दुपारी १२.३० वाजता स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात आली असून, या सेवापूर्ती गौरव सोहळ्यास माजी विद्यार्थी, शिक्षणप्रेमी, नागरिक व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून प्रा. डॉ. शाम तुकाराम सांगळे यांना शुभेच्छा द्याव्यात, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# अंबड प्रशासनाची संवेदनशीलता हलाकीच्या गर्तेत सापडलेल्या शर्मा कुटुंबासाठी जिल्हाधिकारी अन् तहसीलदार ठरले देवदूत

### वृत्तवाहिनीच्या बातमीची तातडीने दखल मध्यरात्रीपूर्वीच पोहोचले महसूल पथक

अंबड ।प्रतिनिधी

समाजातील शेवटच्या आणि अत्यंत गरजू घटकांपर्यंत पोहोचून त्यांना मायेचा आणि प्रशासनाचा आधार देणे हाच खऱ्या अर्थाने लोकसेवेचा मुख्य गाभा आहे याची प्रचिती नुकतीच अंबड शहरात पाहायला मिळाली. हलाकीच्या आणि अत्यंत दयनीय अवस्थेत जगणाऱ्या एका अगतिक कुटुंबाच्या मदतीला जिल्हा आणि तालुका प्रशासन अत्यंत संवेदनशीलतेने धावून आले आहे.

शहरातील मोहन टॉकीजच्या बाजूला जुन्या वेशीजवळ एका भंगारसदृश जागेत अत्यंत वेदनादायी परिस्थितीत जीवन जगत असलेल्या शर्मा कुटुंबाची व्यथा एका वृत्तवाहिनीद्वारे प्रसारित करण्यात आली होती. या बातमीची दखल जालना जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी आशिमा मित्तल आणि अंबडचे तहसीलदार विजय चव्हाण यांनी तातडीने घेतली. दिवसभराचा शासकीय दिनक्रम आटोपल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या सुचनेनुसार तहसीलदार विजय चव्हाण यांनी आपल्या पथकासह थेट या कुटुंबाच्या निवासस्थानी जाऊन त्यांची प्रत्यक्ष भेट घेतली आणि मदतीचा महापूरच तिथे आणला.

निसर्गाचा कठोर आघात अन् हृदयद्रावक परिस्थिती

प्रशासकीय पथकाने जेव्हा या कुटुंबाची



वस्तूस्थिती पाहिली तेव्हा अधिकारीही हेलावून गेले. ज्या जागेला घर म्हणणेही शक्य नव्हते अशा भंगारातील साहित्यापासून बनवलेल्या तात्पुरत्या आडोशात हे कुटुंब राहत आहे. पावसाळ्यात या घरात चक्क १ ते २ फूट पाणी साचून राहते. या कुटुंबात दोन बहिणी आणि एका बहिणीचा मुका-बहिरा मुलगा अशा तीन व्यक्ती एकत्र राहतात. निसर्गाने या कुटुंबावर अत्यंत कठोर आघात केला आहे यातील एका बहिणीला कुष्ठरोगाची बाधा झालेली असून त्यांच्या हाता-पायाला एकही बोट शिल्लक नाही. भाजीपाला विकून हे कुटुंब आपला उदरनिर्वाह चालवत होते मात्र लॉकडाऊन आणि गरिबीमुळे तोही व्यवसाय ठप्प झाला होता.ऑन द स्पॉट शासकीय योजनांचा लाभ

महसूल विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या संजय गांधी निराधार योजनेचा लाभ या कुटुंबातील दोघांना मिळत होता. मात्र ज्या बहीण कुष्ठरोगामुळे अत्यंत गंभीर परिस्थितीत आहेत त्यांना विशिष्ट ओळख दस्तऐवज आयडी नसल्यामुळे या योजनेचा लाभ मिळत नव्हता.

प्रशासनाचा ऑन-द-स्पॉट क्शन प्लॅन

तहसीलदार विजय चव्हाण यांनी तात्काळ केंद्र धारकांशी संपर्क साधला. संबंधित महिलेकडे असलेल्या मतदान कार्डाच्या व्होटर आयडी आधारे जागीच अधिकृत नोंदणीची प्रक्रिया सुरू करण्यात आली.

ही प्रक्रिया पूर्ण होताच त्यांना दिव्यांग योजनेअंतर्गत दरमहा २,५०० रुपयांची विशेष योजना मंजूर करण्यात येणार आहे.

पुरवठा विभागामार्फत तातडीने अंत्योदय रेशन योजनेचा लाभ मंजूर करून अन्नधान्याची तात्काळ व्यवस्था करण्यात आली.उपासमार रोखण्यासाठी खिशातून ५,००० रुपयांची रोकड मागच्या काही दिवसांपासून या कुटुंबाचा भाजीपाला विकण्याचा भाड्याचा हातगाडा पूर्णपणे खराब झाला होता. भाजीपाल्यासाठी भांडवल शिल्लक नसल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली होती. तहसीलदार विजय चव्हाण यांनी स्वतः या कुटुंबाशी संवाद साधून तुम्हाला नेमकी काय मदत हवी आहे ? अशी विचारणा केली. त्यावर कुटुंबाने केवळ २,००० रुपयांच्या भांडवलाची मागणी केली. यावर तहसीलदारांनी क्षणाचाही विलंब न करता स्वतःच्या खिशातून ५,००० रुपयांची रोकड त्यांच्या स्वाधीन केली. तसेच चहा-पाण्यासाठी तात्केदारीने आणखी ५०० रुपये उपलब्ध करून दिले.या कुटुंबाचा स्वाभिमान टिकावा यासाठी प्रशासनाने त्यांना भाड्याच्या गाड्याऐवजी स्वतःच्या मालकीचा एक नवा कोरा हातगाडा खरेदी करून देण्याची संपूर्ण व्यवस्था केली आहे.

कायमस्वरूपी निवासासाठी महसूल संघटना सरसावल्या

या कुटुंबाला या नरकयातनेतून कायमचे बाहेर काढण्यासाठी आता तहसीलदार संघटना नाईब तहसीलदार संघटना आणि महसूल संघटनेच्या वतीने नजीकच्या काळात एक पक्के शेड किंवा घर उभारून देण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न सुरू करण्यात आले आहेत. यासोबतच शासकीय घरकुल योजनेअंतर्गत किंवा जागेचे पट्टे वाटप करून त्यांना हक्काचे मोफत घरकुल मिळवून देता येईल का याची तांत्रिक चाचणी महसूल विभागामार्फत सुरू आहे.प्रशासन नव्हे तर हे आमचे देवदूत कुटुंबाला आले अश्रू

महसूल प्रशासनाने दाखवलेल्या या अत्यंत संवेदनशील आणि तत्पर भूमिकेमुळे शर्मा कुटुंबाला आपले अश्रू अनावर झाले. भावूक होत त्यांनीतहसीलदार साहेब हे आमच्यासाठी देव आहेत आणि जिल्हाधिकारी मॅडम या देवीसारख्या आमच्या पाठीशी धावून आल्या

अशा शब्दांत आपल्या भावना व्यक्त केल्या. महसूल विभागाच्या या संवेदनशील आणि व्यापक भूमिकेमुळे अंबड शहरातून आणि संपूर्ण जिल्ह्यातून प्रशासनाचे कौतुक होत असून प्रशासन असावे तर असे अशी कौतुकास्पद चर्चा नागरिकांमधून सुरू आहे.

# परमार्थात वय वाढले की किंमत वाढते ;प्रपंचात मात्र ती संपते : महंत विठ्ठल महाराज शास्त्री

### आषाढी वारीतील राज्यातील सर्वात मोठी दिंडी चालक महंत विठ्ठल महाराज शास्त्री-माजी आ.भीमराव धोंडे



आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आशीर्वाद हे आई-वडिलांकडून मिळत असतात, पण मानवी जीवनाचे खऱ्या अर्थाने कल्याण होण्यासाठी संत-सज्जनांची कृपाच असावी लागते. संसारात जसे वय वाढते तशी माणसाची किंमत कमी होते;पण परमार्थात मात्र वय वाढेल तशी किंमत आणि अधिकार वाढतो, असे मार्मिक विचार गहिनीनाथगडाचे महंत ह.भ.प. विठ्ठल महाराज शास्त्री यांनी व्यक्त केले. आष्टी-पाटोदा तालुक्याच्या सीमेवर असलेल्या संत वामनभाऊ यांच्या गहिनीनाथ गड हा महाराष्ट्राच्या नकाशावर आलेला आहे. या गडाचे महत्त्व महाराष्ट्र राज्य व महाराष्ट्र राज्याबाहेर देखील आहे. राष्ट्रसंत वामनभाऊ यांच्या पुण्यतिथीला लाखो भाविक भक्त उपस्थित राहतात, एवढेच नव्हे तर महंत विठ्ठल महाराज यांच्या जनसंपर्क आणि पाठपुराव्याने राज्याचे मुख्यमंत्री सह अनेक मंत्री दरवर्षी या गडावर येतात. देवेंद्र फडणवीस हे या गडाचे भक्त झालेले आहेत, त्यांनी गडाच्या विकासासाठी कोट्यावधी रुपये निधी दिलेला आहे. अलीकडेच त्यांनी गहिनीनाथ गड ते पंढरपूर असे संत वामनभाऊ यांची पालखी मार्ग सर्वेक्षणाला संबंधित विभागाला खास आदेश दिला आहे. त्यामुळे हा पालखी मार्ग महंत विठ्ठल महाराज यांच्यामुळे निश्चित होणार असल्याचेही सांगत, पंढरपूरच्या आषाढी वारीतील राज्यातील सर्वात मोठी दिंडी चालक म्हणून महंत विठ्ठल महाराज शास्त्री यांची ओळख निर्माण झालेली आहे असे प्रतिपादन माजी आ. भीमराव धोंडे यांनी केले आहे.आष्टी तालुक्यातील कासेवाडी येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाच्या सांगता प्रसंगी काल्याच्या कीर्तनात ते बोलत होते. यावेळी भाविकांना मार्गदर्शन करताना महंत विठ्ठल महाराज शास्त्री यांनी मानवी जीवन आणि भक्ती यांचे महत्त्व अत्यंत सोप्या शब्दांत उलगडून सांगितले. लीला आणि काला यात मोठे साम्य असल्याचे सांगितले. महंत विठ्ठल महाराज म्हणाले महाराज की, लीला आणि काला यात खूप मोठे साम्य आहे. भगवान श्रीकृष्णाने गोकुळामध्ये विविध लीला केल्या, तर पंढरीच्या वाळवंटामध्ये संत-सज्जनांनी एकत्र येत जीव आणि शिवाचा काला केला. काला हे खऱ्या अर्थाने समाजातील ऐक्याचे आणि समानतेचे प्रतीक आहे. मानवाने आपले जीवन जगत असताना मद, मोह, लोभ आणि मत्सर या सर्व विकारांचा समूळ नाश केला पाहिजे, हीच संतांची शिकवण आहे.वारकरी संप्रदायाच्या उगमस्थानावर प्रकाश टाकताना ते म्हणाले की, या वारकरी संप्रदायाचा मूळ गाभा म्हणजे गहिनीनाथ महाराज होत. त्यांनी निवृत्तीनाथांना ज्ञान दिले आणि त्यानंतर निवृत्तीनाथांनी संत ज्ञानेश्वर माऊलींना उपदेश केला. संत ज्ञानेश्वर माऊलींपासूनच वारकरी संप्रदाय सुरू होऊन त्याचा मोठा विस्तार झाला असला, तरी या संप्रदायाचे मूळ अधिष्ठान हे गहिनीनाथच आहेत असे प्रतिपादन त्यांनी केले. मानवी जीवनाचे सार्थक कशात आहे हे सांगताना महंत विठ्ठल महाराज पुढे म्हणाले की, विठ्ठलाच्या नामस्मरणातच मानवी देहाचे खरे सुख सामावलेले आहे. विठोबाचे दास होण्यातच मोठे भाग्य असते.'मी काय आहे?, मी कोण आहे? आणि मी या मृत्युलोकात कशासाठी आलो आहे? या प्रश्नांची उत्तरे शोधून आणि उमजून भक्ती केली पाहिजे. आपल्या मानवी जन्माचे महत्त्व कळावे, यासाठीच काला असतो. काही कळत नाही, हे कळाले पाहिजे, यासाठी परमार्थ असतो. माणसाचे मन आणि वासना या वडाळ (उधळणाऱ्या) गाईंसारख्या असतात, त्यांना परमार्थाची आणि भक्तीची ओढ लावून योग्य वळणावर आणणे गरजेचे आहे. कासेवाडी येथील या अभूतपूर्व अशा काल्याच्या कीर्तनास आणि महाप्रसादास भाविकांची मोठी मांदियाळी उपस्थित होती.

# दिल्लीत राष्ट्रीय स्तरावर रयत सेविका श्रीम.वर्षा बोडखे (घुले) यांचा काव्य शिरोमणी पुरस्काराने गौरव

## शैक्षणिक,साहित्यिक व सामाजिक कार्याची राष्ट्रीय पातळीवर दखल



आष्टी - (एस.राजेंद्र लाड) शिक्षण, साहित्य आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या रयत शिक्षण संस्थेच्या सेविका श्रीमती वर्षा महादेव बोडखे तथा श्रीमती वर्षा अविनाश घुले यांना दिल्ली येथे राष्ट्रीय स्तरावरील मानाचा काव्य शिरोमणी पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. त्यांच्या या यशामुळे अहिल्यानगर तालुक्यासह जिल्हाभरात शिक्षण आणि साहित्य क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

दिल्ली येथे विश्वात्मक मराठी साहित्य कट्टा यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या साहित्य संस्कृती संगम संमेलनात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यरत असलेले इंटरनॅशनल आयकॉन डॉ. जयलक्ष्मी सांनिपींना यांच्या शुभहस्ते त्यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार देण्यात आला. साहित्यिक आणि शैक्षणिक योगदानाची दखल घेत राष्ट्रीय स्तरावर हा गौरव मिळाल्याने त्यांच्या कार्याला नवी ओळख प्राप्त झाली आहे.

श्रीमती वर्षा महादेव बोडखे तथा श्रीमती वर्षा अविनाश घुले या गेल्या तब्बल ३० वर्षांपासून शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असून त्या रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा गांधी विद्यालय, कर्जत (मुले) येथे सेवेत आहेत. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील राहणाऱ्या, विद्यार्थ्यांमध्ये संस्कारक्षम शिक्षण रुजविणाऱ्या व शैक्षणिक गुणवत्तेसाठी कटिबद्ध असलेल्या शिक्षिका म्हणून त्यांची ओळख आहे.

शिक्षण क्षेत्राबरोबरच सामाजिक आणि पर्यावरणीय उपक्रमांमध्येही त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. राज्यस्तरीय निसर्ग व सामाजिक पर्यावरण मंडळाच्या कार्याध्यक्ष म्हणून गेल्या चार वर्षांपासून त्या अहिल्यानगर येथे कार्यरत असून पर्यावरण संवर्धन, सामाजिक जनजागृती आणि विविध लोकहिताच्या उपक्रमांमध्ये त्या सातत्याने योगदान देत आहेत.

याशिवाय स्वानंदी लायन्स क्लबच्या माध्यमातून गरजू ग्रामस्थांना मदत, सामाजिक बांधिलकी जपणारे उपक्रम आणि समाजोपयोगी कार्य करण्यातही त्या पुढाकार घेत असतात. त्यांच्या कार्यातून सामाजिक जाणीव आणि सेवाभावाचे दर्शन घडत असल्याचे अनेकांनी नमूद केले आहे.

साहित्य क्षेत्रातही त्यांची विशेष ओळख असून विविध लेखन, काव्यरचना आणि साहित्यिक उपक्रमांमध्ये त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले आहे. राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये उत्कृष्ट चरित्र व सारांश स्पर्धेसाठी त्यांची निवड झालेली असून, त्यांच्या साहित्यिक क्षमतेची दखल अनेक स्तरांवर घेण्यात आली आहे.

दिल्ली येथे मिळालेला काव्य शिरोमणी पुरस्कार हा केवळ त्यांचा वैयक्तिक सन्मान नसून शिक्षण, साहित्य आणि सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या महिलांसाठी प्रेरणादायी ठरणारा गौरव असल्याची भावना विविध मान्यवरांनी व्यक्त केली आहे. त्यांच्या या यशाबद्दल शैक्षणिक, साहित्यिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय प्रेरणा पुरस्काराने बाबासाहेब शेळके यांचा गौरव

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू तसेच इंदू मिल स्मारकाचे प्रणेते आनंदराज आंबेडकर यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान

अंबड/प्रतिनिधी

ज्ञानदिप सामाजिक विकास संस्था, नाशिक यांच्यावतीने दिला जाणारा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय प्रेरणा पुरस्कार - २०२६ हा पुरस्कार डोमेगाव (ता. अंबड) येथील सामाजिक कार्यकर्ते बाबासाहेब राधाकिसन शेळके यांना प्रदान करण्यात आला

सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल त्यांची या प्रतिष्ठित पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. काल शनिवारी २३ मे २०२६ रोजी नाशिक येथील कामटवाडे परिसरातील समुद्र लॉन्स येथे आयोजित भव्य समारंभात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.या सोहळ्यात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू तसेच इंदू मिल स्मारकाचे प्रणेते आनंदराज आंबेडकर यांच्या शुभहस्ते बाबासाहेब शेळके यांचा सन्मान करण्यात आला.या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष डॉ. अनिल आठवले,सचिव मिलिंद कळवणकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.सामाजिक बांधिलकी जपत ग्रामीण भागात विविध उपक्रमांच्या माध्यमातून समाजप्रबोधन, जनजागृती व सामाजिक कार्यात सक्रिय योगदान दिल्याबद्दल सामाजिक कार्यकर्ते बाबासाहेब शेळके यांच्या कार्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

या पुरस्काराबद्दल त्यांच्यावर डोमेगाव व परिसरातील विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. पुरस्कार स्विकारतेवेळी त्यांच्या समवेत पत्नी सौ.सविता शेळके तसेच चिरंजीवाचीही उपस्थिती होती.

# एकल महिलांसाठी स्वतंत्र धोरण आखणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य उच्चस्तरीय मसुदा समिती स्थापन

## ७० लाख एकल महिलांच्या सामाजिक-आर्थिक सक्षमीकरणासाठी शासनाचे ऐतिहासिक पाऊल

जालना ।प्रतिनिधी

राज्यातील एकल परित्यक्ता विधवा घटस्फोटीत आणि अविवाहित महिलांच्या सन्मान, सुरक्षा व आर्थिक स्वावलंबनासाठी महाराष्ट्र शासनाने ऐतिहासिक निर्णय घेतला असून एकल महिलांसाठी स्वतंत्र आणि सर्वसमावेशक धोरण तयार करण्याच्या दिशेने मोठे पाऊल उचलले आहे. असे स्वतंत्र धोरण आखणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरणार असल्याने राज्यभरातून या निर्णयाचे स्वागत होत आहे.

महिला व बालकल्याण आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या उच्चस्तरीय मसुदा समितीत विविध शासकीय विभागांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांसह साऊ एकल महिला समिती चे राज्य निमंत्रक हेरंब कुलकर्णी यांचा तज्ज्ञ सदस्य म्हणून समावेश करण्यात आला आहे. शासनाच्या या निर्णयामुळे राज्यातील लाखो एकल महिलांना नवी आशा आणि आधार मिळणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.

जालना जिल्ह्यातील साऊ एकल महिला समिती चे समन्वयक नूतन मघाडे एकनाथ राउत आणि तयब पठाण यांनी शासनाच्या या निर्णयाचे उत्स्फूर्त स्वागत करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे आणि राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांचे आभार मानले आहेत.७० लाख महिलांच्या आयुष्यात नवी दिशा

२०११ च्या जनगणनेनुसार राज्यातील एकल महिलांची संख्या सुमारे ५४ लाख



होती. मात्र बदलत्या सामाजिक परिस्थितीत ही संख्या आता तब्बल ७० लाखांच्या घरात पोहोचल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे या महिलांच्या प्रश्नांकडे स्वतंत्र दृष्टीकोनातून पाहण्याची गरज निर्माण झाली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्पीय भाषणात याबाबत घोषणा केली होती. त्यानंतर महिला व बालकल्याण विभागाने तातडीने कार्यवाही करत मसुदा समितीची स्थापना केली.

ही समिती विविध सामाजिक संस्था शासकीय अधिकारी आणि तज्ज्ञांशी सविस्तर चर्चा करून एकल महिलांच्या हक्कांचे संरक्षण करणारे आणि त्यांना सामाजिक-आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवणारे धोरण तयार करणार आहे. यामुळे प्रशासनात संवेदनशीलता वाढून योजनांची अंमलबजावणी अधिक वेगाने होण्याची अपेक्षा आहे.संभाव्य फायदे ठरणार मोठा आधार या धोरणांतर्गत एकल महिलांसाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्याचा प्रस्ताव असून कौशल्य विकास रोजगाराभिमुख प्रकल्प स्वयंरोजगारासाठी कर्ज प्रक्रिया घरकुल योजना आणि विविध शासकीय योजनांमध्ये प्राधान्य देण्याचा विचार करण्यात येत आहे. यामुळे हजारो महिलांना आत्मनिर्भरतेचा नवा मार्ग खुला होणार आहे.

महाराष्ट्र शासनाने एकल महिलांसाठी स्वतंत्र धोरण जाहीर करून देशासमोर नवा आदर्श निर्माण केला आहे. या निर्णयामुळे एकल महिलांच्या सामाजिक आर्थिक आणि शैक्षणिक सक्षमीकरणाला नवी दिशा मिळेल. स्वतंत्र महामंडळ कौशल्य विकास, कर्जसुविधा आणि योजनांमधील प्राधान्य यामुळे महिलांना स्वाभिमानाने उभे राहण्यास मदत होईल

अशी प्रतिक्रिया साऊ एकल महिला समिती चे जिल्हा समन्वयक एकनाथ राउत यांनी व्यक्त केली.

# समर्थ राजयोगचा महादणका बातमी प्रसिद्ध होताच प्रशासन खडबडून जागे

## जाफराबाद-भोकरदन रोडवरील तो मृत्यूचा सापळा उखडला

भोकरदन/जाफराबाद विशेष प्रतिनिधी इसरारखान पठाण

सत्य दाखवू दखवन जागवू हे केवळ ब्रीदवाक्य नाही तर जनतेच्या हक्कासाठी पेटून उठणारी धगधगती मशाल आहे हे दैनिक समर्थ राजयोग ने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे जाफराबाद-भोकरदन रस्त्यावरील अवैध गतिरोधकांचा भस्मासूर निष्पाप नागरिकांचे बळी घेत असताना झोपेचे सोंग घेतलेल्या कुंभकर्णी प्रशासनाला जागे करण्याचे काम समर्थ राजयोग च्या एकाच बातमीने केले आहे. १९ मे २०२६ रोजी जाफराबाद-भोकरदन रस्त्यावरील गतिरोधक ठरला मृत्यूचा सापळा या मथळ्याखाली प्रसिद्ध झालेल्या बातमीचा असा काही दणका बसला की सार्वजनिक बांधकाम विभाग आणि नगर परिषदेची पळता भुई थोडी झाली. २४ तासांच्या आत प्रशासनाने तातडीने धाव घेत पोद्दार शाळेसमोरील तो जीवघेणा अवैध गतिरोधक जेसीबीच्या सहाय्याने मुळासकट उखडून टाकला आहे

आणि लक्ष्मी कांबळेंचा बळी घेणाऱ्या यंत्रणेला आली जाग

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निर्लज्ज दुर्लक्षामुळे काही दिवसांपूर्वीच नर्मदा पॅलेसजवळ लक्ष्मी कांबळे या ४० वर्षीय महिलेला आपला जीव गमवावा लागला होता. एका निष्पाप महिलेचा बळी गेल्यानंतरही ढिम्म हलत नसलेल्या प्रशासनाचे वाभाडे काढण्याचे काम समर्थ राजयोग ने केले. रिफ्लेक्टर नाही पांढरे पट्टे नाहीत की कोणताही इशारा फलक नाही हे गतिरोधक आहेत की मृत्यूचे सापळे ? असा रोखठोक सवाल समर्थ राजयोग ने उपस्थित केला होता. पोद्दार शाळेसमोरील हाच धोकादायक गतिरोधक अनेक पादचारी आणि विद्यार्थ्यांसाठी काळ ठरत होता याकडे बातमीतून ठळकपणे लक्ष वेधण्यात आले होते.

पत्रकारालाही बसला होता फटका रोज शेकडो जीव टांगणीला

या अवैध गतिरोधकाची भीषणता एवढी होती की ५ मे रोजी रात्रीच्या वेळी दैनिक समर्थ राजयोग चे प्रतिनिधी इसरारखान पठाण हे गौरीशंकर लॉन्सकडे जात असताना अंधारामुळे त्यांना हा गतिरोधक दिसला नाही. दुचाकी थेट आदळल्याने मोठा अपघात होता होता राहिला मात्र यात त्यांच्या मोबाईलचे मोठे नुकसान झाले. स्वत प्रतिनिधीच या अपघातातून थोडक्यात बचावल्याने सामान्य जनतेची काय अवस्था होत असेल हा संताप बातमीतून मांडण्यात आला होता. बातमी सोशल मीडियावर व्हायरल होताच जनतेमध्ये तीव्र असंतोष पसरला आणि अखेर प्रशासनाला गुडघे टेकावेच लागले.

नागरिकांकडून समर्थ राजयोग वर कौतुकाचा वर्षाव

शाळेसमोरील हा गतिरोधक म्हणजे रात्रीच्या वेळी केवळ अदृश्य मृत्यू होता. अनेक विद्यार्थी आणि पालक येथून जाताना अपघातग्रस्त झाले आहेत. जर समर्थ राजयोग ने हा विषय लावून धरला नसता, तर प्रशासनाने आणखी एखाद्या बळीची वाट पाहिली असती. या धाडसी पत्रकारितेचे आम्ही आभार मानतो अशी भावना स्थानिक गावकऱ्यांनी आणि पालकांनी व्यक्त केली आहे.

प्रशासनाचा बचावात्मक पवित्रा शहरात सर्व्हे सुरू करणार

या कारवाईनंतर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले की वृत्तपत्रातील बातमी अत्यंत गंभीर होती. पोद्दार शाळेसमोरील गतिरोधक कोणत्याही नियमात बसत नसल्याने तो तात्काळ हटवण्यात आला आहे. आता शहरातील इतरही सर्व बेकायदेशीर गतिरोधकांचे सर्वेक्षण करून ते हटवले जातील आणि आवश्यक तिथे शास्त्रोक्त पद्धतीने गतिरोधक उभारले जातील.

# विकसित महाराष्ट्र२०४७ साठी स्वारातीम विद्यापीठाची मोठी झेप

नांदेड जिल्हा प्रतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने येथे इतिहास रचला आहे. महाराष्ट्र शासनाने विद्यापीठाला विकसित महाराष्ट्र २०४७ अंतर्गत उच्च शिक्षण क्षेत्रासाठी भारतातील पहिली एआय-ब्लॉकचेन आधारित ऑनलाइन केपीआय मॉनिटरिंग सिस्टीम विकसित करण्याचा २९.९० लाखांचा प्रकल्प दिला आहे. ही प्रणाली राज्यातील सर्व ४२ सार्वजनिक विद्यापीठांच्या २८ मुख्य कार्यक्षमता निर्देशकांचा मागोवा एआय, रिअल-टाइम डॅशबोर्ड आणि ब्लॉकचेन-आधारित ऑडिट ट्रेलच्या माध्यमातून घेईल.

विद्यापीठाचे कुलगुरू तथा प्रकल्पाचे मानद समन्वयक डॉ. मनोहर जी. चासकर यांनी प्रकल्प टीमचे अभिनंदन करताना सांगितले की हे यश विद्यापीठातील प्राध्यापकांच्या समर्पणाचे आणि तांत्रिक कौशल्याचे प्रतिबिंब आहे. यामुळे उच्च शिक्षण डिजिटल प्रशासनात एसआरटीएम विद्यापीठ राष्ट्रीय पातळीवर आघाडीवर राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच, एसआरटीएम विद्यापीठाच्या क्षमतेवर विश्वास ठेवून हा ऐतिहासिक प्रकल्प मंजूर केल्याबद्दल त्यांनी महाराष्ट्र शासनाचे आभार मानले.

प्रकल्पाचे मुख्य अन्वेषक व आयक्यूएसी संचालक डॉ. बी. सुरेंद्रनाथ रेड्डी यांनी सांगितले की, ही नवीन केपीआय मॉनिटरिंग सिस्टीम सर्व ४२ विद्यापीठांमध्ये पारदर्शकता आणि अचूक डेटावर आधारित निर्णयक्षमता आणेल. त्यांनी अधोरेखित केले की त्यांच्या टीमचे इतर मोठे प्रकल्प - पीएम-उषा डॅशबोर्ड (राज्य प्रकल्प संचालनालय, रुसा, महाराष्ट्र शासन) आणि ओयूआयएमएस (उस्मानिया विद्यापीठ, हैदराबाद) - अंतिम टप्प्यात आहेत आणि



लवकरच प्रक्षेपित होण्यास सज्ज आहेत. या सर्व यशांमुळे 'स्वारातीम' विद्यापीठाने उच्च शिक्षण डिजिटल प्रशासनात राष्ट्रीय नकाशावर आपले स्थान निर्माण केले आहे.

हे २८ केपीआय राष्ट्रीय मानकांशी सुसंगत बनवण्यात आले आहेत. सह-अन्वेषिका व शालेय गणित विज्ञान संचालक डॉ. रुपाली एस. जैन यांनी स्पष्ट केले की, या निकषांमध्ये एनआयआरएफ, नॅक आणि युजीसीच्या मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश करण्यात आला आहे, ज्यामुळे विद्यापीठांना राष्ट्रीय रँकिंगशी सुसंगत राहून आपल्या प्रगतीचे योग्य मूल्यांकन करता येईल. सह-अन्वेषक व नवोन्मेष, उद्योग जोडणी व लिंकेजेस संचालक डॉ. एस. जे. वाधेर यांनी नमूद केले की, विविध विद्यापीठांच्या आयक्यूएसी संचालकांच्या सूचनांचा यात समावेश करण्यात आला असून, यामुळे संस्थांना आपल्यातील उणिवा शोधून एकूण कार्यक्षमता सुधारता येईल.प्रणालीचे काम तातडीने सुरू करण्यात आले आहे. प्राथमिक आवृत्ती (तशी-ळेप १.०) तीन महिन्यांत आणि एआय-आधारित अंतिम प्रणाली सहा महिन्यांत सादर केली जाईल. शासनाचा निधी केवळ सॉफ्टवेअर विकासासाठी आहे; सर्व हार्डवेअर व पायाभूत खर्च एसआरटीएम विद्यापीठ स्वतः उचलेल.

प्र-कुलगुरू डॉ. आशोक महाजन, कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा प्रमुख प्रा. एम. के. पाटील तसेच इतर सर्व विधि अधिकारी, संचालक आणि प्राध्यापकांनी प्रकल्प टीमचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे आणि पूर्ण प्रशासकीय मदतीचे आश्वासन दिले आहे. अनेक प्राध्यापकांनीही शुभेच्छा देत या प्रकल्पामुळे विद्यापीठाची प्रतिष्ठा वाढेल आणि राज्याच्या विकासात योगदान मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

# स्वारातीम विद्यापीठात आशाताई जाधव (शिंदे) यांना भावपूर्ण श्रद्धांजली


नांदेड जिल्हा प्रतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील वरिष्ठ लिपीक स्व. श्रीमती आशाताई विजय जाधव (शिंदे) यांच्या दुःखद निधनाबद्दल विद्यापीठाच्या वतीने आयोजित श्रद्धांजली सभा मंगळवार, दि. २६ मे २०२६ रोजी मुख्य प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्षात भावपूर्ण वातावरणात संपन्न झाली.

स्व. आशाताई जाधव (शिंदे) यांनी आपल्या सेवाकाळात कर्तव्यनिष्ठा, प्रामाणिकपणा व समर्पित भावनेने कार्य करत विद्यापीठ प्रशासनात मोलाचे योगदान दिले. त्यांच्या अकाली निधनामुळे विद्यापीठ परिवाराने एक मनमिळावू, कर्तव्यदक्ष व सहृदय सहकारी गमावल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

याप्रसंगी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरु डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.एम.के. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, वित्त व लेखाधिकारी डॉ. राजेश शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजपालसिंह चिखलीकर, जैवतंत्रशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. बी.एस. सुरवसे यांच्यासह अधिकारी, कर्मचारी मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

स्व. आशाताई जाधव (शिंदे) यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन करून ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो व शोकाकुल



परिवारास हे दुःख सहन करण्याची शक्ती प्रदान करो, अशी प्रार्थना करण्यात आली. श्रद्धांजली सभेचा समारोप दोन मिनिटे मौन पाळून करण्यात आला.



# २० व्या सामूहिक विवाह सोहळ्यात चार आंतरजातीय विवाह; सामाजिक समतेचा अनोखा संदेश

किनवट, प्रतिनिधी

सामाजिक समता आणि मानवतेचा संदेश देणारा अजिंक्य बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, किनवट यांच्या वतीने आयोजित २० वा सामूहिक विवाह मेळावा रविवारी (दि.२४) उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या मेळाव्यात तब्बल २६ जोडपी विवाहबंधनात अडकली. विशेष म्हणजे चार आंतरजातीय विवाह पार पडल्याने सामाजिक एकात्मता, बंधुता आणि परिवर्तनाचा प्रभावी संदेश समाजापर्यंत पोहोचला. शहरातील कलावती गार्डन येथे आयोजित या विवाह सोहळ्यात विविध समाजघटकांतील वधू-वरांनी एकत्र येत नवजीवनाची सुरुवात केली. जाती-पातीच्या भिंती ओलांडत चार जोडप्यांनी आंतरजातीय विवाह करून समाजासमोर आदर्श निर्माण केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेल्या सामाजिक समता आणि बंधुभावाच्या विचारांना प्रत्यक्ष कृतीत उतरविण्याचा प्रयत्न या उपक्रमातून दिसून आला. याशिवाय या मेळाव्यात चार जोडपी आदिवासी समाजातील तर एक जोडपे बंजारा समाजातील विवाहबंधनात अडकले. कार्यक्रमाचे उद्घाटन युवा नेते यश ज्योतिबा खराटे यांच्या हस्ते झाले, तर अध्यक्षस्थानी किनवटच्या प्रथम नागरिक नगराध्यक्षा सुजाताताई येंड्रलवार होत्या. यावेळी माजी नगराध्यक्ष इसाखान सरदारखान, के. मूर्ती, नगरसेविका ललिता मुनेश्वर, नगरसेवक प्रवीण राठोड, अभय महाजन, प्रशांत कोरडे, सुनील भवरे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. गेल्या दोन दशकांपासून सातत्याने सुरू असलेल्या या सामाजिक उपक्रमातून आतापर्यंत बाराशेहून अधिक विवाह संपन्न झाले आहेत. आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू कुटुंबांसाठी हा उपक्रम आधारवड ठरत असून विवाह खर्चाचा मोठा भार कमी करण्यास मदत होत आहे.